मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३१२ ■ शनिवार, २५ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा; कर्जमाफीमुळे बळीराजाला मोठा दिलासा – नामदार ॲड. आशिष शेलार

## रायगड जिल्हा किसान मोर्चातर्फे पनवेलमध्ये 'कृतज्ञता मेळावा'; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मानले आभार







**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** मातीची सेवा करणारा, निसर्गाचे रक्षण करणारा आणि देशाला अन्नधान्य पुरवणारा बळीराजा हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य सरकार कटिबद्ध आहे. राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी, वीजबिल माफी तसेच विविध कृषी कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून मोठा दिलासा देण्यात आला आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे ऐतिहासिक निर्णय घेतले असून त्याबद्दल संपूर्ण शेतकरी समाज सरकारप्रती कृतज्ञ आहे, असे प्रतिपादन राज्याचे माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे संपर्क मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी येथे केले.

राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारचे अभिनंदन आणि आभार मानण्यासाठी उत्तर रायगड जिल्हा किसान मोर्चाच्या वतीने मार्केट यार्ड येथे आयोजित करण्यात आलेल्या 'कृतज्ञता मेळाव्या' प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या मेळाव्याला भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस व पनवेल महापालिकेचे सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, दिपके बेहेरे, पनवेल पंचायत समितीच्या रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सागर सांगडे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात नामदार आशिष शेलार म्हणाले की, शेतकरी हा माती आईची सेवा करणारा खरा कर्मयोगी आहे. त्याच्या कष्टातून शेतात सोने पिकते आणि त्याच उत्पादनाच्या विक्रीतून तो आपल्या कुटुंबाचा वर्षभराचा उदरनिर्वाह करतो. मात्र दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, गारपीट आणि इतर नैसर्गिक संकटांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे अशा कठीण काळात शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे ही काळाची गरज आहे आणि हे लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना सुरू केल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनानेही त्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून दिला आहे. या केवळ घोषणा नसून त्यांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. पीएम-किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, कृषी यांत्रिकीकरण, शेतीसाठी आवश्यक खते व साहित्याची उपलब्धता, बाजारपेठेचा विस्तार, सिंचन सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांसारख्या विविध उपक्रमांमुळे शेतकरी अधिक सक्षम होत आहे. शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत पुढील पिढीसाठी शेती अधिक सुरक्षित, शाश्वत आणि फायदेशीर करण्याचे काम सरकार करत असल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वी युरिया खरेदीसाठी शेतकऱ्यांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत होते. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देत खत वितरण व्यवस्था अधिक पारदर्शक आणि सुलभ केली. त्याचबरोबर शेतकऱ्यांना आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यावर सरकारने विशेष भर दिला असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या वीजबिल माफीचा निर्णयही मोठा दिलासा देणारा ठरला आहे. या निर्णयांमुळे लाखो शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी कमी झाल्या असून त्यांना नव्याने उभारी मिळाली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि महायुती सरकारला जनतेचे आशीर्वाद लाभत असल्याचे नामदार आशिष शेलार यांनी सांगितले. यावेळी त्यांनी विधानसभेत सातत्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठविणाऱ्या भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तथा आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या कार्याचे कौतुक करताना या लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शेतकऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे विधानसभेत मांडले असून त्यांच्या कार्यातून शेतकऱ्यांविषयीची तळमळ आणि आस्था स्पष्टपणे दिसून येते, असेही त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाषणात म्हटले कि, आपल्या देशाचा शेतकरी हा केवळ अन्नदाता नाही, तर देशाच्या अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया आहे. शेतकऱ्याच्या कष्टामुळे आपल्या प्रत्येकाच्या घरात अन्न पोहोचते. मात्र अनेक वर्षे नैसर्गिक आपत्ती, उत्पादन खर्चातील वाढ, बाजारभावातील चढ-उतार आणि कर्जाच्या ओझ्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महायुती सरकारने या परिस्थितीची जाणीव ठेवून शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी सरसकट दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केली. हा निर्णय लाखो शेतकरी कुटुंबांना नवसंजीवनी देणारा आहे. त्याचबरोबर वीजबिल माफी, पीक विमा, सिंचन सुविधा, कृषी यांत्रिकीकरण, बाजारपेठेचा विस्तार आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती अधिक सक्षम करण्याचे कामही शासनाने सातत्याने केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने 'पीएम-किसान सन्मान निधी', प्रधानमंत्री पीक विमा योजना, माती आरोग्य पत्रिका, ई-नाम, सूक्ष्म सिंचन, नैसर्गिक शेती आणि कृषी क्षेत्रातील डिजिटल परिवर्तन यांसारख्या अनेक योजनांद्वारे शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली होत असून शेतकरी आत्मनिर्भरकडे वाटचाल करत असल्याचे नमूद केले. तसेच अटल सेतू संपल्यावर टोलनाका जवळील डोंगरावर शिवमुद्रा उभारण्याची मागणी आमदार महेश बालदी यांनी केली होती, त्याला नामदार आशिष शेलार यांनी मान्यता दिली असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी सांगितले.

या मोळाव्याचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी केले. त्यांनी म्हटले कि, आज आपण सर्वजण एका अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार आहोत. महाराष्ट्रातील लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा देणारा सरसकट दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा निर्णय मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने घेतला आहे. हा निर्णय केवळ आर्थिक मदत नसून शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासाला नवी उभारी देणारा आहे. रायगड जिल्हा किसान मोर्चाच्या वतीने आयोजित या कृतज्ञता मेळाव्याचा उद्देश सरकारने शेतकरी हितासाठी घेतलेल्या निर्णयांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे, तसेच शासनाच्या विविध कृषी कल्याणकारी योजनांची माहिती शेतकरी बांधवांपर्यंत पोहोचवणे हा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्या आहेत आणि आता कर्जमाफीसारखे ऐतिहासिक निर्णय यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडत आहेत, असेही त्यांनी सांगितले. मेळाव्याच्या निमित्ताने उपस्थित शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतलेल्या कर्जमाफीच्या निर्णयाचे स्वागत करत सरकारप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक बेहेरे तर आभार सागर सांगडे यांनी मानले.












पनवेल महानगरपालिकेच्या शहर अभियंता पदी श्री राजेश कर्डिले साहेब यांची नियुक्ती करण्यात आली त्याबद्दल त्यांचे नगरसेविका सौ बायजा बबन बारगजे व भाजपाचे भटके विमुक्त मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबनराव बारगजे यांनी अभिनंदन केले ( दैनिक युवक आधार )







## पदवी प्रदान सोहळ्यापूर्वीच विद्यार्थ्यांना 'डिजिलॉकर'द्वारे मिळणार डिग्री

**पुणे :** राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांनी जून २०२६ पर्यंत घेतलेल्या सर्व परीक्षांचे निकाल आणि श्रेयांक विद्यार्थ्यांच्या अपार आयडीशी संलग्न करून ते ३१ जुलैपर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावेत, तसेच निकाल जाहीर झाल्यानंतर पदवीदान समारंभाची वाट न पाहता विद्यार्थ्यांना पदवी व पदविका प्रमाणपत्रे डिजिलॉकरवर उपलब्ध करून द्यावीत, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत 'एक देश, एक विद्यार्थी ओळखपत्र' या धोरणांतर्गत अपार आयडी आणि डिजिलॉकरच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. राज्यात आतापर्यंत २ कोटी ६७ लाख विद्यार्थ्यांचे अपार आयडी तयार झाले असून, ३९.६७ लाख श्रेयांक यशस्वीरित्या हस्तांतरित करण्यात आले आहेत. या कामगिरीमुळे महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर पदवी प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांना पदवीदान समारंभाची प्रतीक्षा करावी लागते.

# कोकणाची वाघीण श्रीमती प्रणाली म्हात्रे यांची सहसचिवपदी बिनविरोध निवड; कर्तृत्व, संघर्ष आणि जिद्दीचा गौरव

## 'कर्मचारी हितासाठी सातत्याने लढणाऱ्या नेतृत्वाला राज्यस्तरीय मान्यता; महिला सक्षमीकरणाचे ठळक उदाहरण'

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : जिद्द, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, संघटन कौशल्य आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या कोकणातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व श्रीमती प्रणाली निखिल म्हात्रे यांची राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र राज्य, रायगड जिल्हा शाखेच्या सहसचिवपदी बिनविरोध निवड झाल्याने कर्मचारी क्षेत्रासह सामाजिक वर्तुळात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या निवडीमुळे रायगड जिल्ह्यातील कर्मचारी चळवळीला नवे बळ मिळणार असल्याची भावना कर्मचारी वर्गातून व्यक्त होत आहे.सामान्य कुटुंबातून पुढे येत अनेक अडचणी, संघर्ष आणि आव्हानांचा सामना करत श्रीमती म्हात्रे यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर कठोर परिश्रम, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या बळावर त्यांनी यशाची शिखरे गाठली आहेत. आज त्यांची झालेली ही निवड केवळ एका पदाची निवड नसून त्यांच्या अनेक वर्षांच्या मेहनतीचा, समर्पणाचा आणि कर्मचाऱ्यांप्रती असलेल्या बांधिलकीचा सन्मान मानला जात आहे.शासकीय कर्मचारी संघटनांमध्ये सक्रियपणे कार्यरत राहून त्यांनी कर्मचारी वर्गाच्या विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवला आहे. कर्मचारी हिताचे विषय, सेवा-सुविधा, न्याय्य हक्क, प्रशासकीय अडचणी तसेच महिला कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत



त्यांनी नेहमीच सकारात्मक व लढाऊ भूमिका घेतली आहे. कर्मचारी वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी विविध स्तरांवर पाठपुरावा केला असून अनेक प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाशी प्रभावी संवाद साधला आहे.रायगड जिल्ह्यातील कर्मचारी प्रश्नांबाबत त्यांनी सातत्याने संघटनात्मक भूमिका घेत कर्मचारी वर्गाला एकत्र आणण्याचे कार्य केले आहे. विविध शासकीय कार्यालये, विभागीय अधिकारी तसेच वरिष्ठ प्रशासनाशी समन्वय साधून कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कर्मचारी कल्याण, सेवा विषयक प्रश्न आणि प्रशासनाशी सुसंवाद या बाबींमध्ये त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते.

महिला कर्मचाऱ्यांच्या समस्या, त्यांचे हक्क, कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी श्रीमती म्हात्रे यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यामुळे महिला कर्मचारी वर्गामध्ये त्यांच्याबद्दल विशेष आदराची भावना असून त्या अनेक महिलांसाठी प्रेरणास्थान ठरल्या आहेत. घर, कुटुंब, सामाजिक जबाबदाऱ्या आणि व्यावसायिक कर्तव्ये यांचा उत्कृष्ट समतोल साधत त्यांनी स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे, संघटन कौशल्यामुळे, सर्वसमावेशक कार्यपद्धतीमुळे आणि कर्मचारी हितासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्यामुळे त्यांना सहसचिवपदासाठी व्यापक पाठिंबा मिळाला. परिणामी त्यांची बिनविरोध निवड झाली. ही निवड त्यांच्या व्यक्तिमत्त्वावरील विश्वासाची, कार्यक्षमतेची आणि त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाची पावती असल्याचे मानले जात आहे.रायगड जिल्ह्यात कर्मचारी संघटना अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. कर्मचारी वर्गातील एकजूट वाढविणे, संघटन मजबूत करणे आणि विविध प्रश्नांवर सामूहिक लढा उभारणे या कामात त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे त्यांच्या निवडीकडे कर्मचारी चळवळीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण घडामोड म्हणून पाहिले जात आहे.त्यांच्या निवडीबद्दल कर्मचारी संघटना, विविध सामाजिक संस्था, सहकारी कर्मचारी, मित्रपरिवार आणि शुभेच्छुकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाखाली कर्मचारी हिताचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील, संघटनात्मक कार्याला अधिक गती मिळेल आणि कर्मचारी वर्गाच्या अपेक्षांना न्याय मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

"संघर्षातून उभे राहिलेले व्यक्तिमत्त्व जेव्हा नेतृत्वाच्या भूमिकेत पोहोचते, तेव्हा ते केवळ स्वतःचे यश नसते; तर अनेकांना प्रेरणा देणारा प्रवास ठरतो," अशा भावना त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत.श्रीमती प्रणाली निखिल म्हात्रे यांची सहसचिवपदी झालेली ही बिनविरोध निवड रायगड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत. कर्मचारी हित, महिला सक्षमीकरण आणि संघटन बळकटीकरणाच्या क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य भविष्यातही अशाच यशस्वी पद्धतीने सुरू राहावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# बारामती हादरली! एस.टी. बँकेच्या संचालकाला ४ लाखांची लाच घेताना एसीबीचा रंगेहाथ सापळा

**दैनिक युवक आधार**

**सणसर :-विकास क्षत्रिय** : बारामतीतील एस.टी.को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडचे संचालक तथा बारामती एमआयडीसी एस.टी.डेपोचे वाहतूक नियंत्रक अनिल तुकाराम बनकर (वय ५१) यांना ४ लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने रंगेहाथ अटक केली.गुरुवार (दि. २३ जुलै) सायंकाळी ६.१९ वाजता बारामती एस.टी. स्टँडसमोरील रस्त्यावर उभ्या असलेल्या चारचाकी वाहनात ही धडक कारवाई करण्यात आली.एसीबीने दिलेल्या माहितीनुसार,तक्रारदाराने एस.टी.को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या बारामती शाखेतील फर्निचर नूतनीकरणाचे काम पूर्ण केले होते.या कामाचे एकूण ४८ लाख ६० हजार ४५५ रुपये इतके बिल झाले होते.



त्यापैकी ४० लाख रुपये अदा करण्यात आले होते,तर ८ लाख ६० हजार ४५५ रुपये आणि इतर किरकोळ कामांचे ४ लाख ९८ हजार रुपये देणे बाकी होते.

उर्वरित बिल मंजूर करून देण्यासाठी आणि संचालक मंडळाकडून मंजुरी मिळवून देण्याच्या मोबदल्यात आरोपी अनिल बनकर यांनी सुरुवातीला ५ लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. पडताळणीदरम्यान ही मागणी ६ लाखांपर्यंत वाढविण्यात आली.अखेर तडजोडीनंतर ४ लाख रुपये स्वीकारण्याचे ठरले.तक्रारदाराच्या तक्रारीनंतर एसीबीने सापळा रचला.त्यानुसार बारामती एस.टी. स्टँडसमोरील रस्त्यावर उभ्या असलेल्या MH-42 BE-5787 या वाहनात अनिल बनकर यांनी तक्रारदाराकडून ४ लाख रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहाथ पकडले.या प्रकरणी बारामती शहर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम,१९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास एसीबीकडून करण्यात येत आहे.या कारवाईत एसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी सापळा अधिकारी,तर पोलीस निरीक्षक सुहास हट्टेकर यांनी तपास अधिकारी म्हणून काम पाहिले.

# स्व. अजितदादा पवार जयंतीनिमित्त मुरुड ग्रामीण रुग्णालयात अभिवादन; मुख्यमंत्री सामुदायिक आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : मुरुड येथील ग्रामीण रुग्णालयात स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम तसेच मुख्यमंत्री सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमातून नागरिकांना विविध आजारांची मोफत तपासणी, उपचार आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजाभाऊ गलांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, परिचारिका तसेच आंतरवासिता वैद्यकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



त्यानंतर मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, ट्रामा केअर युनिट आणि ग्रामीण रुग्णालय, मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री सामुदायिक आरोग्य शिबिर पार पडले. शिबिरात सर्वसामान्य नागरिकांची विविध आजारांसाठी मोफत आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधांचे विनामूल्य वितरण करण्यात आले.

शिबिरादरम्यान गरोदर मातांची तपासणी, मधुमेह (शुगर), रक्तदाब (बीपी), नेत्र तपासणी आणि दंत तपासणी करण्यात आली. तसेच नागरिकांना विविध आरोग्यविषयक सल्ला व उपचार उपलब्ध करून देण्यात आले.

आरोग्यमित्र गोविंद सुरवसे आणि धनंजय नवगिरे यांनी लाभार्थ्यांची आयुष्मान भारत व आभा कार्ड नोंदणी करून देत शासकीय आरोग्य योजनांची माहिती दिली.

याशिवाय तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींसाठी एचपीव्ही (HPV) लसीकरणाचे महत्त्व समजावून सांगत जास्तीत जास्त मुलींनी या लसीकरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

या शिबिराला परिसरातील नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून, मोठ्या संख्येने रुग्णांनी मोफत आरोग्य सेवा व उपचारांचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामीण रुग्णालय, ट्रामा केअर युनिट, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आरोग्य कर्मचारी आणि व्यवस्थापन पथकाने विशेष परिश्रम घेतले.

# आकोटात जंतर मंतर वर विद्यार्थ्यांवर झालेल्या मारहाणी च्या निषेधार्थ मोर्चा !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी** : दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानात आंदोलनकारी विद्यार्थ्यांवर पोलिसांनी जो बेकायदेशीर लाठीमार केला, पोलिसांच्या बेदम लाठीमार मारहाणीत अनेक विद्यार्थी गंभीर जखमी झालेत. या अन्यायाच्या निषेधार्थ तसेच निर्दयी,भ्रष्ट सरकारच्या मंत्र्या च्या राजीनामाच्या मागणी करिता अकोट येथे विद्यार्थी प्रणित भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.संतश्रेष्ठ नरसिंग महाराजांच्या प्रांगणातून निघालेल्या शांतीपूर्ण मोर्च्याची उपविभागीय कार्यालय, अकोट येथे अधिकाऱ्यांना निवेदन देऊन राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली. शुभम तेलगोटे आणि त्यांच्या विद्यार्थी मित्रांनी या यशस्वी मोर्चाचे आयोजन केले होते.यात माजी आमदार संजय गावंडे , राष्ट्रीय कीर्तनकार सत्यपाल महाराज, काँग्रेस चे महेश गणगणे, राजीव



खरोडे,साहित्य संघाचे संस्थापक अध्यक्ष वऱ्हाडी कवी विठ्ठल कुलट, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रशांत पाचडे,शिवसेना उपप्रमुख दिलीप बोचे,माजी नगराध्यक्ष मनिषा माते, छावा संघटना उपजिल्हाप्रमुख डॉ श्याम कोल्हे,सागर उकांडे,गोलू भगत,अचल बेलसरे,अनिकेत कुलट, वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी,नगरसेवक डॉ.गजानन महाले, ॲड.मनोज खंडारे तसेच सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रातील मंडळी सोबत हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते.

# राजीनामा नाही तर माघार नाही; सीजेपीचा सरकारला स्पष्ट इशारा

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली / प्रतिनिधी** : दिल्लीतील विद्यार्थी आंदोलन निर्णायक वळणावर आले असून केंद्र सरकार आणि कॉकरोच जनता पार्टी (CJP) यांच्यातील चर्चेत महत्त्वाची प्रगती झाल्याचा दावा सीजेपीने केला आहे. केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी शुक्रवारी सीजेपीच्या शिष्टमंडळाशी सविस्तर चर्चा केली. आंदोलनकर्त्यांच्या तीन प्रमुख मागण्यांपैकी दोन मागण्यांबाबत सरकारने तत्त्वतः सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगितले जात असले, तरी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबाबतचा अंतिम निर्णय शनिवारी दुपारी २ वाजेपर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे.

बैठकीनंतर सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास यांनी चर्चा सकारात्मक झाल्याचे सांगत उर्वरित मुद्द्यावर निर्णयासाठी सरकारने वेळ मागितल्याची माहिती दिली. शनिवारी सरकारची भूमिका स्पष्ट झाल्यानंतरच आंदोलनाची पुढील दिशा निश्चित केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांनी सरकारने त्यांच्या तीन मागण्या तत्त्वतः मान्य केल्याचा दावा करत उपोषण मागे घेतले. मात्र, धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचा प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सीजेपीचे प्रमुख अभिजीत दिपके यांनी सरकारला थेट इशारा देत, "धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही," अशी ठाम भूमिका जाहीर केली.

सीजेपीच्या प्रमुख मागण्यांमध्ये धर्मेंद्र प्रधानांचा तातडीने राजीनामा, आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची मदत, तसेच २० जुलैच्या संसद मोर्च्यानंतर विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले सर्व गुन्हे मागे घेणे यांचा समावेश आहे. याशिवाय, जंतरमंतर आणि संसद परिसरातील कथित लाठीमाराची स्वतंत्र चौकशी, संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई आणि जखमी विद्यार्थ्यांना मदत करण्याची मागणीही करण्यात आली आहे.उपोषण मागे घेतल्यानंतर प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओ संदेशात सोनम वांगचुक म्हणाले, "धर्मेंद्र प्रधानांनी राजीनामा दिला किंवा नाही, त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होणार नाही; तो स्वतः त्यांच्यावर होईल. आमची सर्वात मोठी चिंता विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल होऊ नयेत हीच होती. कायमस्वरूपी एफआयआर विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करू शकतो."

आता शनिवारी दुपारी २ वाजता धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याबाबत केंद्र सरकार काय निर्णय घेते, याकडे देशभरातील विद्यार्थी, आंदोलनकर्ते आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. या निर्णयावरच सीजेपी आंदोलनाचे भवितव्य आणि माघारीचा अंतिम निर्णय अवलंबून असणार आहे.

# मरणानंतरही मरणयातना कायम! विकास नक्की कोणासाठी? श्रीवर्धनमधील चक्रीवादळग्रस्तांची संतापजनक व्यथा

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : "मरणानंतर तरी माणसाच्या यातना संपतात," असे म्हटले जाते. मात्र, श्रीवर्धन तालुक्यातील काही गावांमध्ये परिस्थिती याच्या अगदी उलट आहे. मृत्यूनंतरच्या शेवटच्या प्रवासातही मृतदेहाला आणि नातेवाईकांना मरणयातना सोसाव्या लागत आहेत. एका बाजूला कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचे दावे युद्धपातळीवर केले जात असताना, दुसऱ्या बाजूला मात्र सामान्य जनतेच्या अंत्यसंस्कारासारख्या अतिशय मूलभूत सुविधेची दैना झाली आहे. यामुळे "विकासकामे नक्की कोणासाठी सुरू आहेत?" असा संतप्त सवाल आता सामान्य नागरिक विचारत आहेत.

**चक्रीवादळाचे घाव अजूनही**



**ओलेच**

काही वर्षांपूर्वी आलेल्या भीषण चक्रीवादळाचा तडाखा श्रीवर्धनमधील अनेक गावांना बसला होता. या वादळात अनेक गावांमधील स्मशानभूमींचे शेड उडून गेले, तर काहींची प्रचंड दुरवस्था झाली. मात्र, इतकी वर्षे उलटूनही येथील परिस्थिती 'जैसे थे' आहे. पावसाळ्यात उघड्यावर अंत्यसंस्कार करताना नातेवाईकांना ताडपत्री किंवा छत्र्या धरून उभे राहावे लागत आहे. निसर्गाच्या कोपानंतर लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने याकडे फिरवलेली पाठ अत्यंत क्लेशदायक आहे.

**मागण्यांकडे कानाडोळा, कोट्यवधींच्या कामांचा मात्र गाजावाजा**

स्थानिक ग्रामस्थांनी अनेक वेळा लेखी आणि तोंडी मागण्या करूनही या मूलभूत समस्यांकडे प्रशासनाने आणि नेतेमंडळींनी जाणूनबुजून कानाडोळा केल्याचा आरोप होत आहे. गावात रस्ते, सुशोभीकरण किंवा इतर हाय-फाय कामांसाठी कोट्यवधींचा निधी मंजूर होत असल्याचे चित्र आहे. मात्र, गावातील स्मशानभूमीची छप्पर दुरुस्त करण्यासाठी निधी मिळत नसल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

जनतेचा आर्त टाहो: सत्ताधारी असो की विरोधक, कोणीतरी धावून या!

"नेतेमंडळींकडे निवडणुकीपुरता वेळ असतो, पण आमच्या रोजच्या आणि मरणानंतरच्या प्रश्नांसाठी त्यांच्याकडे वेळ नाही," अशी भावना एका स्थानिक नागरिकाने व्यक्त केली. सत्ताधारी असो की विरोधक, राजकीय चिखलफेक बाजूला ठेवून आमच्या या गंभीर समस्या आधी सोडवा, अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.

**अजून किती उंबरे झिजवायचे?**

अतिशय हलाखीच्या परिस्थितीत जगणाऱ्या या जनतेला आता हक्काच्या मूलभूत सुविधांसाठी अजून कुठे आणि कोणाचे उंबरे झिजवायचे, असा यक्षप्रश्न पडला आहे. प्रशासनाने आतातरी या गंभीर बाबीची दखल घेऊन युद्धपातळीवर स्मशानभूमीची दुरुस्ती करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# परतूर येथील आदर्श प्राथमिक शाळेत दिंडी सोहळा उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके)** : आषाढी एकादशीचे औचित्य साधून बालाजी नगर, परतूर येथील आदर्श प्राथमिक शाळेत दिंडी सोहळा मोठ्या भक्तिमय व उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पारंपारिक वारकरी वेशभूषा परिधान करून हातात टाळ-मृदुंग घेत विठ्ठल-रुक्मिणीचा जयघोष करीत दिंडी काढली.

'ज्ञानोबा माऊली तुकाराम' च्या गजरात आणि अभंग-भजनांच्या सुरावटीत संपूर्ण शाळेचा परिसर दुमदुमून गेला होता. विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज यांच्या शिकवणीवर आधारित घोषवाक्ये देत वारकरी परंपरेचे महत्त्व विशद केले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची थोर परंपरा, आषाढी वारीचे



महत्त्व तसेच भारतीय संस्कृतीतील भक्ती, शिस्त, एकता आणि समतेचे मूल्य समजावून सांगण्यात आले.

या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उत्साहाने सहभागी झाले होते. दिंडी सोहळ्याचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मोहनकुमार अग्रवाल आणि पालक वर्गाकडून शाळेचे व शिक्षकांचे विशेष कौतुक करण्यात आले.

## भामेश्वर विद्यालय पाटोदा च्या नीट– २०२६ परीक्षेत वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा बीड (प्रतिनिधी)** - पाटोदा शहरातील नामांकित असलेल्या भामेश्वर विद्यालय पाटोदा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा-२०२६ मध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. या मध्ये प्रणव नितीन बामदळे- ५७५, कुमारी श्रावणी ज्ञानेश्वर भोसले- ५७१, कुमारी प्रगती शांताराम ढेरे ५३० व कुमारी मोनिका लक्ष्मण भाकरे५२७ असे गुण घेऊन हे विद्यार्थी वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरलेले आहेत. या निमित्त गुरुवार दिनांक २३ जुलै २०२६ रोजी या विद्यार्थ्यांचा विद्यालयामध्ये सत्कार करण्यात आला. या सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक हरीभगत के.बी. हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अँड.सुशीलजी कवठेकर(माजी नगरसेवक), उमर भैय्या चाऊस (शिक्षण व आरोग्य सभापती नगर पंचायत पाटोदा) तसेच दैनिक झुंजार नेताचे प्रतिनिधी विजय जाधव व गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक शांताराम ढेरे, पाटोदा केंद्राचे केंद्रप्रमुख ज्ञानेश्वर भोसले, लक्ष्मण भाकरे, नितीन बामदळे हे उपस्थित होते. या प्रसंगी शुभांगी अशोक गर्जे हिचा देखील सत्कार करण्यात आला त्याची वैज्ञानिक म्हणून आय आय एस इ आर इथे आय ए




टी मार्फत निवड झाली. त्या बद्दल तिचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे शिक्षक पवळ व्ही.पी.यांनी केले. तर शेवाळे एस.व्ही.यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. सर्वप्रथम लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व अजित दादा पवार यांच्या प्रतिमांचे जयंती निमित्त पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांची भाषणे झाली भाषणानंतर सत्कारमूर्ती विद्यार्थिनी यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी पालकांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षांच्या भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला, या प्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पराग बालड यांची मनसे पनवेल शहर सचिव पदी निवड

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पनवेल महानगर क्षेत्रातील शहर सचिव पदी (पनवेल शहर) पराग सुमनलाल बालड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे विविध क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे. यावेळी मनसेची ध्येयधोरणे, कार्यक्रम संघटनेत राबवावीत आणि नागरिकांच्या हिताचे कामे करावेत अशा प्रकारच्या शुभेच्छा अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिल्या आहेत. या निवडीबद्दल पराग बालड यांच्यावर सामाजिक, शैक्षणिक,



राजकीय, पत्रकार यांच्याकडून अभिनंदन केले जात आहे.

# विद्यार्थ्यांवरील लाठीमाराचा निषेध; निफाडमध्ये महाविकास आघाडीचा तीन तास एल्गार

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : दिल्लीत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमाराच्या निषेधार्थ आणि केंद्र सरकारच्या कथित दडपशाहीविरोधात सोमवारी निफाड शहरात महाविकास आघाडी व मित्रपक्षांच्या वतीने तीव्र धरणे आंदोलन व रास्ता रोको करण्यात आला. तब्बल तीन तास चाललेल्या या आंदोलनामुळे परिसरातील वाहतुकीवर परिणाम झाला. केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली, तर विद्यार्थ्यांच्या न्याय्य आंदोलनाला पाठिंबा दर्शवत लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.

माजी आमदार अनिल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या आंदोलनाचे नेतृत्व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तालुकाप्रमुख खंडू बोडके पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख विक्रम रंधवे, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष गौरव पानगव्हाणे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष सचिन खडताळे, काँग्रेस तालुकाध्यक्ष साहेबराव ढोमसे आणि राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष भूषण शिंदे यांनी केले. महाविकास आघाडीच्या विविध घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांवरील लाठीमाराचा निषेध व्यक्त केला. "विद्यार्थ्यांच्या आवाजाला लाठीच्या जोरावर दाबण्याचा प्रयत्न




हा लोकशाहीच्या गळा घोटण्याचा प्रकार आहे. देशातील युवक आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्याऐवजी त्यांच्यावर बळाचा वापर केला जात आहे. ही भूमिका लोकशाहीला घातक असून त्याचा तीव्र निषेध करण्यात येत आहे," अशी भावना आंदोलकांनी व्यक्त केली.

रास्ता रोको आंदोलन सुरू असताना पोलिसांनी आंदोलन मागे घेण्याबाबत आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. मात्र, आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख खंडू बोडके पाटील यांनी आक्रमक भूमिका घेत पोलिसांशी तीव्र शाब्दिक वाद घातला. काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, पोलिसांनी संयमाची भूमिका घेतल्याने कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. आंदोलनकर्त्यांच्या ठाम भूमिकेनंतर प्रशासनानेही परिस्थिती शांततेने हाताळली.

आंदोलनावेळी माजी आमदार अनिल कदम यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कार्यकर्त्यांशी संवाद साधत केंद्र सरकारवर टीका केली. "विद्यार्थ्यांच्या न्याय्य आंदोलनाला लाठीने उत्तर देणारे सरकार लोकशाहीच्या मूल्यांवरच घाला घालत आहे. मतभेदांचा आवाज दडपून लोकशाही मजबूत होत नाही. विद्यार्थ्यांवर अन्याय करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई झाली पाहिजे. दडपशाहीपुढे जनता कधीही झुकणार नाही," असे ते म्हणाले.यानंतर महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने तहसीलदार विशाल नाईकवाडे यांना निवेदन सादर केले. विद्यार्थ्यांवरील लाठीमाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, आंदोलनकर्त्यांवरील कारवाई मागे घ्यावी आणि नागरिकांच्या लोकशाही हक्कांवर गदा आणणारे धोरण तात्काळ थांबवावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास राज्यभर तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही महाविकास आघाडीच्या नेत्यांनी दिला.

या आंदोलनात शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पार्टी तसेच महाविकास आघाडीच्या विविध घटक पक्षांचे पदाधिकारी, नगरसेवक आणि शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये मधुकर शेलार,विनायक शिंदे, सुहास सुरळीकर, राहुल बनकर, विलास खडताळे, उत्तमराव निरभवणे, सुनील कदम, नितीन काळे, अरुण डांगळे, जय जाधव, कामेश शिंदे, वृषाल पगार, रोहित लभडे, ओमकार शिंदे, दीपक जाधव, दीपक कदम, सचिन गीते, बापूसाहेब कुंदे, सुरज कुंदे, इरफान सय्यद, अमोल दाते, रतन गाजरे, बंटी ढमाले, यश कापडी, सर्वकष भोसले, माँटी भामरे, अभिमान भोर, गौरव कापसे, तुकाराम उगले, संकेत चोरडिया, रावसाहेब कुंदे, दत्तू भुसारे, महेश क्षीरसागर, रोशन शिंदे, लाला कातकाडे, नितीन कापसे, नितीन गवळी, श्रीनिवास गवळी, योगेश कुयटे, विजय गवळी, नाना तिडके, राजेंद्र राजोळे, राहुल घुगे, गणेश शिंदे, स्वप्निल बिनायकिया, सचिन होळकर, जयदीप कुंदे, अलीभाई शेख, नंदकिशोर कापसे, रोहिणी शेळके, तौसिफ राजे, मनोज निरभवणे, सचिन शेलार, रुषीकेश सोनावणे, सुरज साळवे, वैभव कर्डक, योगेश गवळे, दुर्योधन गांगुर्डे, अकिला भाभी शेख, जयश्री कर्डक, जयश्री वाघ, सोमनाथ शिंदे, मधुसूदन आव्हाड, पूजा तासकर आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## माजी आ. भीमराव धोंडे यांच्या वतीने संत वामनभाऊ महाराज दिंडी सोहळ्यातील हजारो वारकऱ्यांना महापंगत, २६ वर्षाची परंपरा कायम

**दैनिक युवक आधार**

**आष्टी मराठवाडा संपर्कप्रमुख मारुती सत्रे** : विठ्ठल नामाचा गजर करीत दहा दिवसांच्या प्रवासानंतर पंढरपूर जवळील पखालपूर येथील श्री क्षेत्र गणपती मंदिर येथे श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाच्या संत वामनभाऊ महाराज यांच्या पायी दिंडी सोहळ्यातील हजारो वारकऱ्यांना माजी आमदार भीमराव धोंडे यांच्यावतीने गुरुवारी २३ जुलै २०२६ रोजी महापंगतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये हजारो वारकऱ्यांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला. गेल्या २६ वर्षापासून महाराष्ट्र गौरव माजी आ.भीमराव धोंडे हे वारकऱ्यांना पंढरपूर जवळील पखालपुर येथे महापंगत देतात.

दिनांक २२ जुलै रोजी संत सावता महाराज संजीवन समाधी असलेल्या अरण येथे मुक्काम करून दिंडी पखालपूर कडे रवाना झाली. आषाढी एकादशीच्या निमित्ताने राज्यातील लाखो वारकरी आपापल्या भागातील दिंड्यामधून पांडुरंगाच्या चरणी लीन होण्यासाठी येतात.

श्री क्षेत्र संत वामनभाऊ महाराज यांच्या दिंडीत मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यातील हजारो वारकरी सहभागी झाले आहेत. १३० वर्षापूर्वी संत वामन भाऊ महाराज यांनी या पालखी सोहळ्याची सुरुवात केली होती. अहिल्यानगरसह मराठवाड्यातील वारकरी संत वामनभाऊ महाराज यांच्या दिंडीत सहभागी होतात. मराठवाड्यातील सर्वात मोठा पालखी सोहळा म्हणून श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या दिंडीची ओळख आहे. महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गहिनीनाथ गड येथून दहा दिवसांपूर्वी या पालखी सोहळ्याचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले होते. दोन दिवसांपूर्वी रोपळे येथे माजी आ. भीमराव धोंडे पायी दिंडी सोहळ्यात सहभागी झाले, पाच ते सात किलोमीटर अंतर दिडींत वारकऱ्यासोबत चालत पाच तास दिंडीचा आनंद घेतला. अरण येथील मुक्कामनंतर दिंडी सोहळा पंढरपूर जवळील पखालपूर येथे आल्यानंतर माजी आ. भीमराव धोंडे यांच्या उपस्थितीत महाआरती झाली त्यानंतर पालखीसाठी नैवेद्य दाखविण्यात आला. त्यानंतर वारकऱ्यांच्या पंगती बसविण्यात आल्या. माजी आ. भीमराव धोंडे, सौ. दमयंतीताई धोंडे,महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अजयदादा धोंडे, सौ. अक्षताताई धोंडे, युवा नेते अभयराजे धोंडे, शेतकरी शिक्षण पतसंस्थेचे चेअरमन राजेश धोंडे यांनी वारकऱ्यांना पंगतीत महाप्रसाद वाढण्याचे काम केले. दुपारच्या महाप्रसादानंतर दिंडी सोहळा पंढरपूरकडे रवाना झाला. याप्रसंगी उपसभापती पांडुरंग नागरगोजे, महेश कारखान्याचे व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, संचालक रत्नदीप निकाळजे, बाबा वाघुले, विठ्ठल लांडगे, चेअरमन बाळासाहेब शिंदे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, माजी सभापती अनिल जायभाय, डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, उपसंपादक उत्तम बोडखे, इंजि. एम.एम.बडे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ,माजी सरपंच संजय नालकोल, पांडुरंग गावडे, देवा गरकळ, रघुनाथ शिंदे,ज्ञानदेव केदार, वसंत जायभाय, दिलीप जायभाय, पांडुरंग नेहरकर, बाबासाहेब ढाकणे, राजाभाऊ केदार, महारुद्र खेडकर, आसाराम बडे महाराज, गहिनीनाथ खेडकर महाराज, आजिनाथ लाड महाराज, रामशास्त्री वनवे महाराज, राजपाल शेंडगे, श्रीकांत सानप,शिवाजी वनवे महाराज, हनुमंत कावळे, ॲड.भाऊसाहेब लटपटे, सावळेराम जायभाय, विष्णू कराळे, सोनाजी गांजुरे,किसन गांजुरे, शिवाजी थोरवे , प्राचार्य सुरेश बोडखे, भीमराव आहेर, बद्रीनाथ आजबे, नागेश आवारे, सुधाकर कुलकर्णी,भागवत वारे, इंजि. पी. बी. बोडखे, दादासाहेब काळे, डॉ. सागर वाघुले, प्राचार्य डॉ. एस. एन. वाघुले,चेअरमन शाम सांगळे, प्राचार्य सुरेश बोडखे, डॉ . मुश्ताक शेख, डॉ, विनोद ढोबळे,संजय शेंडे, माऊली बोडखे,संदीप नन्नवरे आदि मान्यवर उपस्थित होते.

## कळंबोली–रोडपाली–कामोठे (मानसरोवर रेल्वे स्थानक) लिंक रोडच्या विकासासाठी नगरसेविका सौ. बायजा बबन बारगजे यांचे महापौरांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : कळंबोली–रोडपाली–कामोठे (मानसरोवर रेल्वे स्थानक) प्रस्तावित लिंक रोड तातडीने विकसित करण्यात यावा, अशी मागणी नगरसेविका सौ. बायजा बबन बारगजे यांनी पनवेल महानगरपालिकेच्या महापौरांकडे निवेदनाद्वारे केली.निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सदर लिंक रोड विकसित झाल्यास कळंबोली, रोडपाली आणि कामोठे परिसरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊन नागरिकांना सुरक्षित, जलद आणि सुलभ प्रवासाची सुविधा मिळेल. भविष्यातील वाढती लोकसंख्या आणि वाहतूक लक्षात घेता या रस्त्याचे काम प्राधान्याने हाती घेणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी नगरसेविका सौ बायजा बबन बारगजे भाजपा भटके विमुक्त मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बबनराव बारगजे, कळंबोली / रोडपाली कामोठे लिंक रोड कृती समितीचे प्रमुख महेंद्र खबाले, राजेंद्र सूर्यवंशी तसेच भाजपा पदाधिकारी सौ कमल सरगर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनीही नागरिकांच्या हितासाठी हा महत्त्वाचा लिंक रोड लवकरात लवकर विकसित करण्याची मागणी प्रशासनाकडे केली.या मागणीच्या




निवेदनाच्या प्रती पनवेल महानगरपालिकेचे माननीय आयुक्त मंगेश चितळे, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, शहर अभियंता राजेश कर्डिले तसेच सभागृह नेते प्रकाश बिनेदार यांनाही देण्यात आल्या असून, या महत्त्वाच्या प्रश्नावर तातडीने सकारात्मक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला दिलासा मिळावा आणि परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळावी यासाठी महानगरपालिकेने आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून लिंक रोडचे काम तातडीने सुरू करावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## जंतर–मंतर लाठीचार्जच्या निषेधार्थ मुरुड कडकडीत बंद; व्यापारी, नागरिक आणि वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते रस्त्यावर

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला लातूर तालुक्यातील मुरुड शहरात मोठा प्रतिसाद मिळाला. सकाळपासूनच शहरातील प्रमुख बाजारपेठ, व्यावसायिक प्रतिष्ठाने आणि विविध व्यापारी आस्थापने स्वेच्छेने बंद ठेवण्यात आली. व्यापारी, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले.

बंदच्या पार्श्वभूमीवर शहरात शांततेचे वातावरण कायम होते. नागरिकांनी कोणताही अनुचित प्रकार घडू न देता लोकशाही मार्गाने आपला निषेध नोंदवला. अनेक ठिकाणी आंदोलकांनी विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईचा निषेध करत घोषणाबाजी केली. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर लाठीचार्ज करण्यात आल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या




पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, लोकशाही देशात शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर होणे अत्यंत दुर्दैवी आहे. विद्यार्थ्यांच्या आवाजाला दडपण्याऐवजी त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे. आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीचार्जची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे तातडीने मागे घ्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

मुरुडमधील व्यापाऱ्यांनीही स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभाग घेत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. बंदमुळे शहरातील दैनंदिन व्यवहार काही काळ ठप्प झाले असले तरी नागरिकांनी आंदोलनाला सहकार्य करत शांतता आणि संयम राखला.

संपूर्ण आंदोलन शांततापूर्ण वातावरणात पार पडले. कोणताही अनुचित प्रकार घडला नसून बंददरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहिली. या आंदोलनातून मुरुडकरांनी विद्यार्थ्यांप्रती एकजूट व्यक्त करत लोकशाही मूल्यांवरील आपली निष्ठा अधोरेखित केली. बंदला मिळालेला प्रतिसाद हा विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत समाजातील विविध घटकांची संवेदनशीलता आणि लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याची भूमिका अधोरेखित करणारा ठरला.

## शिळफाटा–कल्याण फाटा येथील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांची संयुक्त बैठक

### अपर पोलीस आयुक्त अशोक दुधे व वाहतूक अधिकारी अतुल अहिरे यांच्याशी चर्चा, लवकरच उपाययोजना होणार

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत, ग्रामिण प्रतिनिधी** : शिळफाटा आणि कल्याण फाटा सर्कल परिसरात दररोज होणाऱ्या भीषण वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना होणाऱ्या प्रचंड त्रासाच्या पार्श्वभूमीवर दक्ष नागरिक संघटना आणि भूमिपुत्र धर्माभिमानी संघटना यांनी पुढाकार घेतला आहे.

या संदर्भात ठाणे शहराचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक दुधे आणि मुंब्रा वाहतूक अधिकारी श्री. अतुल अहिरे* यांच्याशी संयुक्त बैठक घेऊन निवेदन देण्यात आले.

या चर्चेसाठी स्थानिक नगरसेविका सौ. वेदिका साहिल पाटील, भूमिपुत्र धर्मभिमानी संघटनेचे तालुका प्रमुख बाबुराव मुंडे, साहिल पाटील (भाजपा ठाणे जिल्हा अध्यक्ष अभियंता प्रकोष्ट ठाणे), वैशाली भोसले(काँग्रेस जिल्हा महिला अध्यक्ष ), रवींद्र पाटील(जिल्हा मंत्री बजरंग दल ), प्रविण पावशे(प्रखंड संयोजक शीळ दहिसर देसाई ), भगवान फौजदार, करण खारपाटील, गिरीश पाटील(जिल्हा संयोजक बजरंग दल ), सुनील आलिमकर(मानवसेवा संघटना ),





ज्येष्ठ पत्रकार मंगल खारपाटील,ॲडवोकेट जितेश पाटील,शरद पाटील(मनसे कल्याण विधानसभा सचिव ), दैनिक 'अक्षराज' चे पत्रकार विनोद वास्कर, पत्रकार रमेश राऊत, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत उपस्थित सर्वांनी शिळफाटा-कल्याण फाटा परिसरातील वाहतूक कोंडीचे अचूक मुद्दे प्रशासनासमोर मांडले. नागरिकांना दररोज होणाऱ्या त्रासाची माहिती देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

चर्चेनंतर दोन्ही अधिकाऱ्यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेतली असून, लवकरच या ठिकाणी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना राबविल्या जातील आणि नागरिकांना यातून दिलासा मिळेल, असे आश्वासन दिले आहे.दरम्यान, दक्ष नागरिक संघटनेने यापूर्वीही मुंब्रा येथील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी पाठपुरावा करत ४० वाहतूक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या करून घेतल्या होत्या.

# राज्यातील प्रत्येक घटकाला आदर्श प्रशासनाचा प्रत्यय देऊ – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**दैनिक युवक आधार**
**वाडी प्रतिनिधी राकेश यादव**

**नागपूर :** राज्यातील सर्व समाज घटकातील व्यक्तींना सोबत घेऊन प्रत्येकाला विकासाची संधी भेटली पाहिजे याचे उत्तरदायित्व स्वीकारुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कार्यशैलीतून अपूर्व ठसा निर्माण केला आहे. लोकनेतृत्वाचे हे आदर्श मापदंड आहे. याचबरोबर सेवा हेच समर्पण या भुमिकेतून ज्यांनी आयुष्य वेचले असे लोकनेते स्व. अजितदादा पवार यांचा आज स्मृतीदिन आहे. या दिनविशेषाला अधोरेखित करतांना आपण अनेक लोकोपयोगी उपक्रम आज राबवित आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसानिमित्त या उपक्रमांच्या माध्यमातून सदिच्छा देण्यासह स्व. अजितदादा पवार यांच्या समर्पणाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण आपण करीत असल्याचे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त व माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयतीनिमित्त जिल्हा प्रशासनाच्या वतीने बेलतरोडी येथील पाचमंदिर मैदान येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान व महाआरोग्य शिबीर कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी बेसा-पिपळा नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष कीर्तीताई बडोले, बहादुरा नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष प्रतिक्षाताई खंदाडे, उपमहापौर लिलाताई हाथीबेड, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते व अधिकारी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकाभिमुख, पारदर्शी व गतिमान राज्याचा प्रत्यय देऊन आपल्यापुढे एक आदर्श मापदंड निर्माण केला आहे. याचबरोबर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला मौलिक अधिकार दिला. महाराष्ट्राच्या या ऐतिहासिक व सामाजिक उत्तरदायित्वाच्या आदर्शांना डोळ्यापुढे ठेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सर्वसामान्यांना आदर्श प्रशासनाचा प्रत्यय यावा यादृष्टीने आपण महाराजस्व अभियान हाती घेतले असे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. राज्यातील 14 कोटी जनतेला त्यांच्या हक्कांना न्याय देण्यासह आपण दिलेल्या आश्वासनांची पुर्तता विविध निर्णयांच्या माध्यमातून आपण करीत आहोत. आज या ठिकाणी सुमारे अडीच हजार लाभार्थ्यांना लाभ देत असून सर्व शिबीरांच्या माध्यमातून



लाखो बांधवांपर्यंत पोहचत असल्याचे त्यांनी सांगितले.

**राज्यातील प्रत्येकाच्या मालमत्तेचे रक्षणाची जबाबदारी महसूल विभागाची**

शासनाचे विश्वस्त म्हणून निष्पक्ष काम करण्याची भूमिका आम्ही स्वीकारली आहे. राज्यातील प्रत्येकाच्या मालमत्तेचे रक्षण ही शासनाची जबाबदारी आहे. याच भूमिकेतून आम्ही प्रत्येकाची जागा कायदेशिर करुन देत आहोत. सोलापूर मधील 9 हजार घरांना मुख्यमंत्र्यांनी कायदेशिर करुन दिले. कोल्हापूर मधील सुमारे 55 गावे ब्रिटीशकालीन निगडीत होते. येथील 55 गावांना कायदेशिर करुन देण्यात आले आहे. गडचिरोली येथे फाळणीपासून बांगलादेशी नागरिकांनी तेथे बांधलेल्या घरांचा प्रश्न प्रलंबीत होता. मुख्यमंत्र्यांच्या दूरदृष्टीखाली आपण तो मार्गी लावला. सुमारे 12 हजार परिवाराला ते राहत असलेल्या जागेचे कायदेशिर मालकत्व देण्यात आले. याचबरोबर फाळणीमध्येच जे सिंधी बांधव अनेक महानगरात विखुरले गेले त्यांचा आजवर स्वमालकीच्या न सुटलेल्या प्रश्नाही आपण अधिकृत करुन दिले असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

**जे वचन दिले ते नेटाने पूर्ण करू**

जे वचन आम्ही जनतेला दिले होते ते मनस्वी पूर्ण करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. शेतकऱ्यांचे सुमारे 46 हजार कोटी रुपये एवढे वीजबील व इतर देयके शासनाने माफ केले. बहिणींसाठी लाडकी बहीण योजना सुरु केली. महिलांना शेतकऱ्यांचा दर्जा दिला. त्यांना शेतकरी म्हणून आता आहे त्या सर्व योजना देण्याचा आपण प्रयत्न करु असे त्यांनी सांगितले. 1 जानेवारी 2011 पूर्वी ज्या गरिब व्यक्तीनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण केले अशा लोकांना जागेचा पट्टा आपण दिला. झुडपी जंगलाचे प्रश्न आपण मार्गी लावले आहे. 15 ऑक्टोबर 2024 पूर्वी ज्यांनी घर/प्लाट घेतला आहे अशा प्लाटधारकांना आता कायदेशिर दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगून सुमारे 55 सेवा आपण राजस्व अभियानात समाविष्ठ केल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील सर्व शिबीरांच्या माध्यमातून सुमारे 90 लक्ष परिवारांना आम्ही आदर्श सेवेचा प्रत्येय दिला आहे.

या शिबीरात 220 लोकांना मालकी हक्काचे पट्टे, 400 लोकांना स्वामित्व हक्क प्रमाणपत्र, आरोग्य शिबीर, कृषी विभाग, पंचायत समिती, एकात्मिक आदिवासी विभाग व नगरपरिषद, नगरपंचायत अंतर्गत विविध सेवांचे प्रमाणपत्र यावेळी शिबीरात वाटप करण्यात आले. 98 शेतमजूर महिलांना शासनाच्या नवीन धोरणानुसार शेतकरी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. उमरेड येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज 101 लाभार्थ्यांना पट्टे वितरण व इतर विविध लाभांचे वाटप महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले.

**सफाई कामगारांच्या योगदानाचा गौरव**

सफाई कामगारांच्या कार्याच्या गौरवातून आपण खऱ्या अर्थाने आजचा हा अनोखा दिवस सेवा समर्पण दिवस म्हणून साजरा करीत आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सफाई कामगारांसाठी व्यापक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. लाडपागे समिती अंतर्गत सफाई कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासह त्यांच्या परिवारातील लोकांनाही स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध व्हावी ही शासनाची भूमिका आहे. महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाच्या माध्यमातून अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी अनेक चांगले उपक्रम आयोजित करुन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला जपत समाजाला दीशा दिल्याचे गौरोद्गार राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काढले.

सफाई कामगारांच्या कष्टाचा गौरव व्हावा याउद्देशाने इमामवाडा आयसोलेशन हॉस्पीटलच्या परिसरात आयोजित भव्य सेवा गौरव दिन समारंभात ते बोलत होते. यावेळी महापौर निताताई ठाकरे, आमदार मोहन मते, आमदार डॉ. परिणय फुके, उपमहापौर लिलाताई हाथीबेड,माजी महापौर दयाशंकर तिवारी, स्थायी समितीच्या अध्यक्षा शिवाणी दाणी, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यात प्रथमच एवढया मोठ्या प्रमाणात सफाई कामगारांच्या योगदानाचा गौरव होत असल्याचे शेरसिंग डागोर यांनी आपल्या प्रस्ताविक भाषणात सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडपागे समितीची प्रभावी अंमलबजावणी करुन यात असलेल्या यात असलेल्या त्रुटींना दूर करीत अधिकाधिक लोकांना न्याय दिला आहे. त्यांच्या दूरदृष्टीतूनच सफाई कामगारांच्या मुलांनाही आता किराण दुकान, शिलाई मशिन, सायकल, ई-रिक्षा याच्या माध्यमातून स्वयंरोजगाराला चालना देत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महापौर निता ठाकरे, माजी महापौर दयाशंकर तिवारी व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सुमारे 1 हजार 200 लाभधारकांना विविध साहित्याचे वाटप करण्यात आले. यात सुमारे पाचशे महिलांना शिलाई मशिन वाटप, ई-रिक्षा, सायकल आदींचा समावेश होता.




# पुरी रथयात्रेत भाविकांसाठी फॉर्च्युन तर्फे 'मिक्स्ड रिॲलिटी–व्हर्च्युअल रिॲलिटी' चे आयोजन

## लाइव्ह किचनच्या माध्यमातून ओडिशामधील खाद्यपदार्थांची चव प्रत्यक्ष भाविकांना अनुभवता आली

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** एडब्ल्यूएल ॲग्री बिझनेस लिमिटेडने, आपला प्रमुख ब्रँड फॉर्च्यून च्या माध्यमातून वार्षिक रथयात्रा उत्सवासाठी पुरीमध्ये पुनरागमन केले. संस्कृती, पारंपरिक पाककला, नावीन्य आणि अर्थपूर्ण ग्राहक सहभाग यांना एकत्र आणून, या ब्रँडने भारतातील सर्वात मोठ्या उत्सवांपैकी एक असलेल्या या सोहळ्यादरम्यान भाविक आणि पाहुण्यांना एक अविस्मरणीय अनुभव देण्याची तयारी केली. एक समग्र ब्रँड इकोसिस्टम म्हणून डिझाइन केलेल्या या कार्यक्रमात मिक्स्ड रिॲलिटी (एमआर) आणि व्हर्च्युअल रिॲलिटी (व्हीआर) अनुभव, एआय-सक्षम फोटो बूथ, पाककलेचे प्रात्यक्षिक, उपयुक्तता-आधारित उपक्रम आणि फॉर्च्युन खाद्यतेलाचे जार तसेच पीईटी बाटल्यांसारख्या पॅकेजिंगचा वापर करून बनवलेली रथाची एक प्रतिकात्मक मांडणी यांचा समावेश होता. या संपूर्ण सोहळ्यादरम्यान, फॉर्च्युन सनफ्लॉवर ऑइल केंद्रस्थानी होते; ग्राहकांशी जोडल्या जाणाऱ्या प्रत्येक माध्यमातून, विविध




खाद्यपदार्थांमधून आणि कार्यक्रमांमधून ते प्रामुख्याने लोकांपर्यंत पोहोचवले गेले.

मुकेश मिश्रा, विक्री आणि विपणन विभागाचे संयुक्त अध्यक्ष, एडब्ल्यूएल ॲग्री बिझनेस लिमिटेड म्हणाले,"विविध समाजानं एकत्र आणणाऱ्या परंपरा, खाद्यसंस्कृती आणि सांस्कृतिक क्षण साजरे केल्यानेच ग्राहकांशी अत्यंत अर्थपूर्ण नाते निर्माण होते, यावर आमचा विश्वास आहे. लाखो भाविकांसाठी रथयात्रेला अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि फॉर्च्युनच्या माध्यमातून या भव्य उत्सवाचा पुन्हा एकदा भाग होता आल्याचा आम्हाला अभिमान वाटतो. यावर्षी आम्ही एक सर्वसमावेशक अनुभव तयार केला, ज्यामध्ये अन्न, तंत्रज्ञान, संस्कृती आणि भाविकांसाठी उपयुक्त सेवा यांचा मेळ घातला गेला. संस्कृतीशी एकरूप करणारा हा अनुभव देऊन, आम्ही असे अविस्मरणीय क्षण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जे या उत्सवाचा उत्साह दर्शवतात आणि त्याचबरोबर भारतातील घराघरांमध्ये फॉर्च्युनचे विशेष स्थान अधिक दृढ करतात."

लाइव्ह किचनच्या माध्यमातून ओडिशामधील खाद्यपदार्थांची चव प्रत्यक्ष अनुभवता आली. फॉर्च्युनची उत्पादने वापरून आणि फॉर्च्युन सनफ्लॉवर आणि फॉर्च्युन राईस ब्रॅन ऑईलच्या साहाय्याने तयार केलेले काकरा पिठा व सोयाबीन चॉप्स यासारखे पारंपरिक ओडिया पदार्थ पाहुण्यांना खायला मिळाले. महिला प्रेक्षकांना या लाइव्ह किचन उपक्रमात सहभागी होण्याचे निमंत्रण देण्यात आले, ज्यामुळे त्यांना उत्पादनांचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला आणि फॉर्च्युनच्या उत्पादनांची गुणवत्ता तसेच कार्यक्षमता यावरील विश्वास अधिक दृढ झाला.रथयात्रेच्या आठवणी कायमस्वरूपी जपण्यासाठी फॉर्च्युनने पुरी बीचवर एआय (AI) तंत्रज्ञानावर आधारित फोटो बूथ सुविधाही उपलब्ध करून दिली. या इंटरॅक्टिव्ह झोनमध्ये पाहुण्यांना ओडिशाच्या वैशिष्ट्यपूर्ण पार्श्वभूमीवर स्वतःचे फोटो काढता आले; यामुळे महोत्सवातील अनोख्या आठवणी आणि इतरांसोबत शेअर करण्याजोग्या डिजिटल आठवणी तयार झाल्या.

# रक्तदान करून स्व. अजितदादा पवार यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**
**वाडी प्रतिनिधी राकेश यादव**

**नागपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महासचिव आनंदसिंह यांच्या वतीने माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त फरस चौक येथील त्यांच्या जनसंपर्क कार्यालय परिसरात भव्य रोगनिदान व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी होत आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. तसेच रक्तदाब (बीपी) व मधुमेह (शुगर) नियंत्रणात कसा ठेवावा, याबाबत तज्ज्ञांकडून



मार्गदर्शन घेऊन महत्त्वपूर्ण माहिती जाणून घेतली. शिबिरात ३५ जणांनी रक्तदान करून समाजात रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत जनजागृतीचा संदेश दिला. यावेळी भव्य अन्नदान कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी स्व. अजित पवार यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण अभिवादन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रितेश लककेवार, रुबी बरटी, प्रमोद ससासे, रवी विश्वकर्मा, विजय गौरकर, कमल भट्टड, लोकेश पुरोहित, धर्मेंद्र भटेजा, डेविडभाई, बच्चू तिवारी, पप्पू राऊत, रंजीत मेश्राम, डॉ. रामटेके, डॉ. मेंढे आदींनी विशेष परिश्रम घेतले.



# वंचित बहुजन आघाडी वतीने पुकारलेल्या बंदला पाटोद्यात उत्स्फूर्त प्रतिसाद
# शिवसेना(उबाठा) व राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने दिला बंदला जाहीर पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** जंतर-मंतर, नवी दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ व देशभरातील अन्यायकारक परिस्थितीच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला पाटोदा शहरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे, स्थानिक व्यापारी व आठवडी बाजाराच्या विनंतीचा मान राखत गुरुवार २३ जुलै ऐवजी हा बंद शुक्रवार दिनांक २४ जुलै रोजी पाळण्यात आला. या निर्णयामुळे शहरातील सर्व स्तरातील नागरिकांना सहभागी होण्याची संधी मिळाली आणि बंद अधिक प्रभावी व यशस्वी ठरला. शुक्रवारी सकाळपासूनच पाटोदा शहरातील मुख्य बाजारपेठा, दुकाने, आस्थापने पूर्णपणे बंद ठेवण्यात आली होती. शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि गल्लीबोळांमध्ये शांततेत बंद पाळण्यात आला. "धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या", "जय भीम", "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो", "सरकार चले जाओ" अशा घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले होते. या घोषणांमधून जनतेचा रोष आणि अन्यायाविरुद्धचा संताप स्पष्टपणे दिसून आला. या बंदमध्ये शैक्षणिक संस्थांनीही सक्रिय सहभाग घेतला. शहरातील अनेक शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेस यांनी स्वयंस्फूर्तीने आपले व्यवहार बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. विद्यार्थ्यांमध्येही या विषयाबाबत जागरूकता दिसून आली. जंतर-मंतरवरील घटनेच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांनीही शांततेत निषेध व्यक्त केला. पाटोदा शहरातील व्यापाऱ्यांनी या बंदला मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला. व्यापाऱ्यांनी स्वखुशीने दुकाने बंद ठेवून आंदोलनाची ताकद वाढवली. बाजारपेठ पूर्णपणे बंद राहिल्यामुळे बंदचा प्रभाव स्पष्टपणे जाणवला. व्यापाऱ्यांच्या या एकजुटीमुळे आंदोलन अधिक व्यापक झाले आणि प्रशासनाचेही लक्ष या प्रश्नाकडे वेधले गेले. या बंदला राजकीय स्तरावरही मोठा पाठिंबा मिळाला. वंचित बहुजन आघाडीबरोबरच शिवसेना(उबाठा) आणि राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनीही सक्रिय सहभाग नोंदवला. सर्व पक्ष एकत्र येऊन सामाजिक न्यायाच्या मुद्द्यावर एकत्र उभे राहिल्याचे चित्र या निमित्ताने पाहायला मिळाले. बंद यशस्वी करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर, माजी तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांनी नेतृत्व केले. त्यांच्या सोबत शिवसेना(उबाठा) तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांच्यासह विविध





पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी बाळासाहेब जावळे, भाई विष्णुपंत घोलप, शिवभूषण जाधव, कॉ.महादेव नागरगोजे, गणेश कवडे, बळीराम ससाने, धम्मानंद जावळे, सिद्धार्थ आगे, सनी आगे, अर्जुन वालेकर गणेश बर्डे, कैलास बर्डे, विशाल धसके, यांच्या सारख्या अनेक कार्यकर्त्यांनी बंद यशस्वी करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली. विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत कोणताही गोंधळ न घालता शांततेच्या मार्गाने बंद पार पाडला. या बंद दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यात आली. पोलिस प्रशासनानेही योग्य ती खबरदारी घेतली होती. शहरात कुठे ही अनुचित प्रकार घडला नाही, त्यामुळे हा बंद पूर्णपणे शांततेत पार पडला. प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांमधील समन्वयामुळे शहरात शिस्तबद्ध वातावरण पाहायला मिळाले. या आंदोलनामागील प्रमुख कारण म्हणजे जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांवर झालेला लाठीचार्ज आणि त्यातून निर्माण झालेली असंतोषाची लाट होय. विद्यार्थ्यांच्या न्याय मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली. या वेळी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीही जोरदारपणे करण्यात आली. सामाजिक न्याय, शिक्षण व्यवस्था आणि विद्यार्थ्यांचे हक्क या मुद्द्यांवर सर्वसामान्य नागरिक एकत्र आल्याचे या बंदमधून दिसून आले. पाटोदा शहरातील हा बंद केवळ एक आंदोलन नसून अन्यायाविरुद्धची सामूहिक भूमिका असल्याचे स्पष्ट झाले. विविध राजकीय पक्षांनी आपसातील मतभेद बाजूला ठेवत एकत्रितपणे आंदोलनात सहभाग घेतल्यामुळे या बंदाला वेगळीच ताकद मिळाली. पाटोदा शहरातील नागरिकांनीही या बंदला सकारात्मक प्रतिसाद दिला. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने घराबाहेर न पडता बंद यशस्वी करण्यात हातभार लावला. या मुळे शहरात पूर्णपणे शांतता आणि एकजूट दिसून आली. एकूणच, वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वाखाली, शिवसेना आणि काँग्रेसच्या पाठिंब्याने पाटोदा शहरात पाळण्यात आलेला महाराष्ट्र बंद अत्यंत यशस्वी ठरला. या बंदमधून सामाजिक प्रश्नांवर जनतेची जागरूकता आणि एकजूट स्पष्टपणे दिसून आली. भविष्यातही अशा प्रकारे सर्व समाजघटक एकत्र येऊन अन्यायाविरुद्ध आवाज उठवतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# स्मार्ट मीटरचा 'शॉक' ! मुरुडकरांची वीजबिले दुप्पट? भीम क्रांती संघ आक्रमक; महावितरणकडे तातडीच्या चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण/ मोहम्मद पिंजारी :** मुरुड शहरात नव्याने बसविण्यात आलेल्या स्मार्ट मीटरवरून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, पूर्वीच्या तुलनेत दुप्पट वीजबिले येत असल्याचा गंभीर आरोप भीम क्रांती संघाने केला आहे. या पार्श्वभूमीवर संघटनेने महावितरणच्या उपकार्यकारी अभियंत्यांना निवेदन देत स्मार्ट मीटरची तांत्रिक तपासणी, वाढीव बिलांची चौकशी आणि आवश्यक ती दुरुस्ती करण्याची जोरदार मागणी केली आहे.



भीम क्रांती संघाच्या म्हणण्यानुसार, मुरुडमधील अनेक घरांमध्ये विजेचा वापर पूर्वीप्रमाणेच असून कोणतीही अतिरिक्त विद्युत उपकरणे वापरात आलेली नाहीत. तरीही स्मार्ट मीटर बसवल्यानंतर मासिक वीजबिलात मोठी वाढ झाल्याचे नागरिक सांगत आहेत. त्यामुळे स्मार्ट मीटरच्या अचूकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, मीटरमध्ये तांत्रिक दोष किंवा चुकीचे रीडिंग होत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

संघटनेने निवेदनात असा दावा केला आहे की, काही ठिकाणी घरातील वीज उपकरणे बंद असतानाही मीटर वेगाने चालत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. प्रत्यक्ष वीज वापर आणि मीटरवरील नोंद यामध्ये मोठी तफावत दिसून येत असल्याने ग्राहक आर्थिक भाराखाली दबले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी स्वतंत्र तांत्रिक पथक मुरुडमध्ये पाठवावे, प्रत्येक तक्रारीची पडताळणी करावी, जुन्या मीटरच्या बिलांची आणि स्मार्ट मीटरनंतरच्या बिलांची तुलनात्मक तपासणी करावी तसेच चुकीची बिले आढळल्यास ती तातडीने दुरुस्त करावीत, अशी मागणी भीम क्रांती संघाने केली आहे.

हे निवेदन जिल्हा सचिव शाहीन सय्यद यांच्या स्वाक्षरीने महावितरणकडे सादर करण्यात आले असून, मुरुड शहर उपाध्यक्ष किशोर म्हस्के यांनीही या मागणीला पाठिंबा दिला आहे. निवेदनाची प्रत लातूर ग्रामीणचे आमदार रमेश (अप्पा) कराड यांनाही माहितीस्तव देण्यात आली आहे.

दरम्यान, स्मार्ट मीटरमुळे वाढीव वीजबिले येत असल्याचा दावा भीम क्रांती संघाने केला असला तरी, या दाव्याबाबत महावितरणची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे आता महावितरण या तक्रारींची दखल घेऊन तपासणी करते का, याकडे मुरुडसह परिसरातील वीज ग्राहकांचे लक्ष लागले आहे.

# अनियमित पावसामुळे विस्कटलेली शेती आता पुन्हा बहरली
## श्रीवर्धन तालुक्यात भात लावणीला वेग

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित :** श्रीवर्धन तालुक्यात समाधानकारक पावसाने हजेरी लावल्यानंतर भात लावणीच्या कामांना चांगलाच वेग आला असून सर्वत्र शेतात लगबगीचे वातावरण निर्माण झाले आहे. यंदा सुरुवातीच्या काळात अनियमित आणि अपुऱ्या पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. काही ठिकाणी पेरलेले बियाणे उगवले नाही, तर अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणी करण्याची वेळ आली होती.

मात्र गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये शेतकरी कुटुंबे पारंपरिक पद्धतीने भात लावणी करताना दिसत असून शेतांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

चिखल-मातीमध्ये दिवसभर राबणारा बळीराजा आणि त्याला साथ देणाऱ्या महिला पारंपरिक भातलावणीची गाणी गात शेतीची कामे करत आहेत. ही गाणी केवळ श्रम हलके



करण्यासाठी नसून, अस्मानी संकटांपासून पिकांचे रक्षण व्हावे, भरघोस उत्पादन मिळावे आणि निसर्गाची कृपा कायम राहावी, अशी भावपूर्ण प्रार्थना त्यातून व्यक्त होत असते.

कोकणातील भात लावणी ही केवळ शेतीची प्रक्रिया नसून ग्रामीण संस्कृती, परंपरा आणि निसर्गाशी असलेले नाते जपणारा एक सांस्कृतिक वारसा आहे. समाधानकारक पावसामुळे यंदाच्या हंगामाबाबत शेतकऱ्यांच्या अपेक्षा पुन्हा उंचावल्या असून, पुढील काळातही पावसाची साथ कायम राहावी, अशीच आशा बळीराजा व्यक्त करत आहे.

# दिल्लीतील घटनेचे सोयगावात व तालुक्यात पडसाद; बंद पाळत सर्वपक्षीय निषेध रॅली

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : दिल्ली येथील जंतर-मंतर परिसरात विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या कथित अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ आणि सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी गुरुवारी सोयगाव शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.वंचित बहुजन आघाडीच्या आवाहनाला विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि व्यापारी बांधवांनी प्रतिसाद दिल्याने सकाळपासून शहरातील बहुतांश व्यवहार बंद राहिले. सकाळी ६ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शांततेत बंद पाळण्यात आला.

दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर २० जुलै रोजी लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान पोलिसांकडून झालेल्या कारवाईत एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याचा दावा आंदोलकांकडून करण्यात आला असून अनेक विद्यार्थी जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदचे आवाहन केले होते.त्यानुसार सोयगावातही बंदचे आयोजन करण्यात आले.बंदच्या पार्श्वभूमीवर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून निषेध आंदोलनास सुरुवात करण्यात आली.त्यानंतर वाल्मिकपुरा,नारळीबाग मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत सर्वपक्षीय व सर्व संघटनांच्या वतीने भव्य रॅली काढण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज चौकात रॅलीचे सभेत रूपांतर झाले.यावेळी वंचित बहुजन आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष सिद्धार्थ मोरे,राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष रवींद्र काळे, तालुकाध्यक्ष दीपक देशमुख,कृष्णा पाटील,काँग्रेसचे राजेंद्र काळे,आदिवासी संघटनेचे शेख गुलाब मामु,भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक सुभाष जाधव, महिला तालुकाध्यक्ष



सुशीला इंगळे, तालुकाध्यक्ष मुकुंदा वाहुळे आणि कवी अनिल शेळके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.आंदोलनाच्या माध्यमातून दिल्लीतील घटनेचा निषेध नोंदवत विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यात आला.त्यानंतर सोयगावचे नायब तहसीलदार संभाजी देशमुख तसेच एपीआय दिनकर गोरे यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

या बंदमध्ये दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा), समता सैनिक दल, भीम आर्मी सेना, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस, आदिवासी संघटना, व्यापारी संघटना, रिपब्लिकन सेना तसेच विविध आंबेडकरी विचारसरणीच्या पक्ष व संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पूर्व तालुकाध्यक्ष सचिन शिंदे,पश्चिम तालुकाध्यक्ष गणेश सोनवणे,तालुका समन्वयक मनोहर जगताप, मगरे,भीम आर्मीचे तालुकाध्यक्ष राजू वानखेडे,शेख बबलू,दीपक नवगीरे, पगारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सचिव भरत पगारे यांनी केले, तर आभार वंचित बहुजन आघाडीचे सिद्धार्थ मोरे यांनी मानले.बंदच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी सपोनि दिनकर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय गजानन आरेकर आणि सोयगाव पोलिसांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. बंददरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. शांततेत आंदोलन पार पडले.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी स्कूल बस नियमावलीत मोठे बदल !!
# नियमांचे उल्लंघन केल्यास परवाना रद्द होणार !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी:** शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने स्कूल बस नियमावलीमध्ये सुधारणा करत 'महाराष्ट्र मोटार व्हिईकल्स (स्कूल बस करिता विनियम), २०२६ पहिली सुधारणा' लागू केली आहे. या नवीन नियमांचे पालन करणे सर्व शाळा व्यवस्थापन आणि वाहन चालकांसाठी बंधनकारक करण्यात आले असून, पुढील तीन महिन्यांत याची पूर्तता न केल्यास वाहनाचा परवाना निलंबित किंवा रद्द केला जाईल, असा इशारा अकोला उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिला आहे.

**शाळेत 'शालेय वाहतूक समिती' स्थापन करणे अनिवार्य :**

नवीन नियमांनुसार प्रत्येक शाळेमध्ये 'शालेय वाहतूक समिती' स्थापन करावी लागणार आहे. ही समिती आर.टी.ओ.ने निश्चित केलेल्या दरानुसार स्कूल बस आणि व्हॅनचे भाडे तपासणे, पालकांच्या तक्रारींचे निवारण करणे आणि प्रत्येक तिमाहीचा अहवाल जिल्हा शालेय बस सुरक्षितता समितीला सादर करण्याचे काम करेल. स्कूल बस आणि व्हॅनचे भाडेदर प्रति विद्यार्थी प्रति किलोमीटर याप्रमाणे प्रादेशिक परिवहन कार्यालय ठरवणार असून, आकारले जाणारे भाडे निश्चित दरापेक्षा १० टक्केपेक्षा कमी किंवा जास्त नसावे.




**कर्मचाऱ्यांची पोलीस आणि वैद्यकीय पडताळणी आवश्यक :**

स्कूल बस किंवा व्हॅनवर नियुक्त केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची (वाहन चालक, महिला व पुरुष परिचर) शाळा व्यवस्थापन किंवा वाहन मालकाकडून लेखी आदेशाद्वारे नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच पोलिसांकडून त्यांचे चारित्र्य पडताळणी रिपोर्ट (व्हेरिफिकेशन) आणि शासकीय रुग्णालयातून वैद्यकीय अहवाल घेणे बंधनकारक केले आहे. शाळांना सर्व कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि वैयक्तिक कागदपत्रांचा संपूर्ण रेकॉर्ड ठेवावा लागेल.

**सुरक्षेसाठी आधुनिक डिजिटल प्रणाली आणि तंत्रज्ञान बंधनकारक**

विद्यार्थ्यांच्या रिअल टाईम ट्रॅकिंगसाठी आणि सुरक्षिततेसाठी प्रत्येक स्कूल बसमध्ये 'डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम' असणे गरजेचे आहे. यामध्ये खालील सुविधांचा समावेश असेल:

- केंद्र सरकारच्या AIS-१४० नियमांनुसार प्रमाणित 'व्हिईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस' (VLTD) आणि GPS ट्रॅकिंग अनिवार्य असेल.
- वाहनांमध्ये CCTV कॅमेरे बसवणे बंधनकारक असून, पालकांसाठी मोबाईल ॲपद्वारे लाईव्ह ट्रॅकिंग आणि डिजिटल हजेरीची सुविधा उपलब्ध करून द्यावी लागेल.
- CCTV फुटेजचा किमान ३० दिवसांचा बॅकअप ठेवणे शाळा व्यवस्थापन किंवा वाहन मालकावर बंधनकारक राहील, जो आवश्यकतेनुसार आर.टी.ओ. किंवा पोलिसांना द्यावा लागेल.
- प्रत्येक वाहनात आग प्रतिबंधक यंत्रणा म्हणून AIS-१३५ प्रमाणित सिस्टीम किंवा इंजिन कम्पार्टमेंटमध्ये किमान १ किलोचा 'फायर बॉल' फिक्स करावा लागेल.
- प्राथमिक व पूर्व प्राथमिक वर्गातील लहान विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र महिला परिचर (अटेंडंट) नियुक्त करणे बंधनकारक असेल.

**वाहनांचे वय आणि इतर नियम**

नवीन सुधारणेनुसार स्कूल बसचे कमाल वय आता १५ वर्षांऐवजी २० वर्षे निश्चित करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, वाहनातील विद्यार्थ्यांच्या प्रत्येक सीटला सीटबेल्ट असणे आवश्यक आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी विशेष सपोर्ट सिस्टीम आणि प्रशिक्षित परिचर पुरवावे लागतील, ज्याची तपासणी वाहनाच्या वार्षिक फिटनेस सर्टिफिकेटच्या वेळी केली जाईल.

**तीन महिन्यांची मुदत; आर.टी.ओ.चा कडक कारवाईचा इशारा :**

शिक्षण विभाग आणि परिवहन अधिकारी संयुक्तपणे या वाहनांची नियमित तपासणी करणार असून त्याचा अहवाल जिल्हा समितीला सादर केला जाईल. तीन महिन्यांच्या आत अकोला जिल्ह्यातील सर्व शाळा व्यवस्थापन आणि स्कूल बस/व्हॅन मालकांनी या नियमांची पूर्तता करावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मोहम्मद समीर मोहम्मद याकूब यांनी केले आहे. मुदतीत बदल न केल्यास मोटार वाहन नियमांतर्गत कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दहावी, बारावीच्या परीक्षेतील विशेष गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**मुंबई :** प्रतिकूल परिस्थितीवर मात करून इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या बालगृह, निरीक्षणगृह आणि खुले निवारा गृहातील विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा माटुंगा येथील बेहरामजी जीजीभाई होम फॉर चिल्ड्रन्स येथे झाला. मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय आणि बाल कल्याण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

विशेष गुणवंत गौरव व सत्कार सोहळा – २०२६ च्या कार्यक्रमास बाल कल्याण समिती अध्यक्ष महादेव सावंत, मुंबई शहर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार, बाल कल्याण समिती सदस्य श्याम मिस्त्री, अरुणा काटकर, मुग्धा दांडेकर, उषा गायकवाड यांच्यासह आशियाना फाउंडेशनचे विनोदभाई शाह, ग्रेस फाउंडेशनचे शंकर मुगलखोद, हमारा फाउंडेशनच्या प्रिया शेंडे, ऑल इज वेल फाउंडेशनचे प्रकाश राजन, बी.जे होम संस्थेच्या अधीक्षिका अनघा माळवी, जिल्हा परिविक्षा अधिकारी महेश पाटील आदी उपस्थित होते.

बाल कल्याण समितीचे अध्यक्ष महादेव सावंत यांनी प्रतिकूल परिस्थितीत उल्लेखनीय यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील शिक्षण व करिअर वाटचालीसाठी मोठी स्वप्ने बाळगण्याचे आवाहन केले. महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. मर्यादित सुविधांमध्येही जिद्दीच्या जोरावर यश मिळवलेल्या मुलांची ही कामगिरी अतुलनीय असून अशा गौरव सोहळ्यांमुळे मुलांचा आत्मविश्वास अधिक दृढ होतो, असे प्रतिपादन त्यांनी केले.

# लोकप्रतिनिधींच्या पत्रांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष
## नगरसेवक प्रथमेश सोमण प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर बरसले!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेवक प्रथमेश सोमण यांनी प्रशासनाच्या उदासीन आणि वेळकाढू कार्यपद्धतीवर अत्यंत अभ्यासपूर्ण व आक्रमक लक्षवेधी मांडून प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. लोकप्रतिनिधींनी पाठवलेल्या पत्रांवर महिना उलटूनही प्रशासन कोणतीही कारवाई करत नाही किंवा उत्तरेही देत नाही, असा आरोप करत त्यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.



आपला वैयक्तिक अनुभव सांगताना नगरसेवक सोमण म्हणाले, "मी स्वतः विविध नागरी समस्यांसंबंधी मार्च, एप्रिल आणि जुलै महिन्यात प्रशासनाला अनेक पत्रे दिली आहेत. परंतु, या पत्रांचा पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून वेळेत कोणतीही उत्तरे मिळत नाहीत. जर एका लोकप्रतिनिधीच्या पत्रांची ही अवस्था असेल, तर सामान्य नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या अर्जांचे काय होत असेल?" असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

आपल्या भाषणात सोमण यांनी नगर विकास विभाग आणि राज्य शासनाच्या 2013, 2014 व 2018 मधील विविध परिपत्रकांचा आणि जीआरचा हवाला दिला. शासन निर्णयानुसार, "लोकप्रतिनिधींच्या पत्रांना 7 दिवसांच्या आत पोच देणे आणि 15 ते 30 दिवसांच्या आत त्यावर लेखी अहवाल किंवा कारवाईची माहिती देणे बंधनकारक आहे." तसेच 2005 च्या विशेष कायद्यातील कलम 3 आणि 4 अंतर्गत कामात विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची स्पष्ट तरतूद असतानाही प्रशासन या नियमांचे उल्लंघन करत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

महापालिका अधिनियमातील कलम 36 व 64 चा उल्लेख करत त्यांनी महापौर व पीठासीन अधिकाऱ्यांकडे मागणी केली की, "शासनाचे नियम आणि जीआर हे केवळ कागदावर दाखवण्यासाठी नसून त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. जे अधिकारी लोकप्रतिनिधींच्या पत्रांकडे दुर्लक्ष करतात किंवा कारवाईस विलंब लावतात, अशा अधिकाऱ्यांवर प्रशासनाने कडक कारवाई करून एक आदर्श घालून द्यावा."

लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या प्रश्नांना प्रशासनाने गांभीर्याने घेऊन तात्काळ सकारात्मक पावले उचलावीत, अशी ठाम मागणी करत नगरसेवक प्रथमेश सोमण यांनी आपला विषय सभागृहापुढे मांडला.

# विष्णुनगर शिवार हादरले! बेपत्ता शेतमजुराचा विहिरीत मृतदेह; पोलीस पाटील रामकृष्ण सुरासे यांच्या सतर्कतेने उलगडला प्रकार

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी :** निफाड तालुक्यातील विष्णुनगर शिवारात बेपत्ता झालेल्या शेतमजुराचा विहिरीत मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. पोलीस पाटील रामकृष्ण पुंजाराम सुरासे यांच्या सतर्कतेमुळे या घटनेची माहिती तातडीने लासलगाव पोलिसांना मिळाली. त्यानंतर चांदोरी आपत्ती व्यवस्थापन समितीने अवघ्या एका तासात शोधमोहीम पूर्ण करून मृतदेह बाहेर काढला.




मिळालेल्या माहितीनुसार, गावातील कांदा व्यापारी ऋषिकेश सोपान ठुबे यांच्या शेतात मजुरीचे काम करणारे नितीन सिताराम जाधव (वय ४२, मूळ रा. जोपूळ, ता. चांदवड, जि. नाशिक) हे सकाळपासून बेपत्ता होते. याबाबत ऋषिकेश ठुबे यांनी विष्णुनगरचे पोलीस पाटील रामकृष्ण सुरासे यांना माहिती दिली.

यानंतर परिसरात शोध घेत असताना शेजारील शेतकरी रमेश कचेश्वर जेऊघाले यांच्या गट क्रमांक ९४ मधील विहिरीजवळ नितीन जाधव यांच्या चप्पल, दोन मोबाईल फोन तसेच तणनाशकाची बाटली आढळून आली. अनर्थाची शक्यता ओळखून पोलीस पाटील रामकृष्ण सुरासे यांनी तात्काळ लासलगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधला.

माहिती मिळताच लासलगाव पोलीस, चांदोरी आपत्ती व्यवस्थापन समितीचे रेस्क्यू पथक आणि स्थानिक ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले. विहिरीतील पाणी उपसून शोधमोहीम सुरू करण्यात आली. अथक प्रयत्नांनंतर अवघ्या एका तासात विहिरीच्या तळाशी नितीन जाधव यांचा मृतदेह आढळून आला. रेस्क्यू पथकाने मृतदेह बाहेर काढून ग्रामीण रुग्णालय, लासलगाव येथे शवविच्छेदनासाठी पाठविला.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तपासणीत पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृत्यूचे नेमके कारण व इतर बाबींचा पुढील तपास सुरू आहे.

या दुर्दैवी घटनेने विष्णुनगर परिसरात शोककळा पसरली आहे. संकटाच्या क्षणी पोलीस पाटील रामकृष्ण सुरासे यांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे यंत्रणा तातडीने घटनास्थळी पोहोचली, तर चांदोरी आपत्ती व्यवस्थापन समितीच्या रेस्क्यू पथकाने धाडसी आणि जलद कारवाई करत अवघ्या एका तासात मृतदेह बाहेर काढून शोधमोहीम यशस्वी केली.

# स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त 'दादा कायम सोबत हायत' हे भावगीत प्रदर्शित

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय :** महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला,विचारांना आणि जनसामान्यांशी असलेल्या अतूट नात्याला उजाळा देणारे "दादा कायम सोबत हायत" हे भावगीत गुरुवार,दि.23 जुलै 2026 रोजी प्रदर्शित करण्यात आले.अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती येथील सांस्कृतिक विभागाच्या निर्मितीतील या गीताचे प्रकाशन महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते सहयोग सोसायटी येथील निवासस्थानी उत्साहपूर्ण वातावरणात झाले.अजितदादांच्या कार्याची जनसामान्यांप्रती असलेल्या त्यांच्या जिव्हाळ्याची आणि त्यांच्या आठवणींची भावनिक गुंफण या गीतातून करण्यात आली आहे."दादा शरीराने आपल्यात नसले,तरी त्यांच्या विचारांचा,कार्याचा आणि प्रेरणेचा वारसा कायम आपल्या सोबत आहे,"हा संदेश गीतातून प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. त्यामुळे उपस्थितांच्या मनात भावनिक वातावरण निर्माण झाले.या गीताचे गीतकार व गायक केतन यादव असून,त्यांनी आपल्या हृदयस्पर्शी शब्दांत




आणि भावपूर्ण आवाजातून अजितदादांप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त केली आहे.हे गीत त्यांच्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर देखील प्रदर्शित करण्यात आले असून, अल्पावधीतच अनेकांकडून त्याचे कौतुक होत आहे.यावेळी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे प्रा.भीमराव तोरणे,प्रा. सोमनाथ कदम,प्रा.राजेंद्र कंडरे,यशवर्धन चव्हाण तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी गीताचे कौतुक करत अजितदादांच्या कार्याची आठवण जागवणारा हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे सांगितले.स्वर्गीय अजितदादा पवार यांनी आयुष्यभर सामान्य माणसाच्या विकासासाठी,शिक्षण,सहकार,शेती आणि ग्रामीण भागाच्या उन्नतीसाठी दिलेले योगदान महाराष्ट्र कधीही विसरणार नाही.त्यांच्या जयंतीनिमित्त सादर करण्यात आलेले "दादा कायम सोबत हायत" हे गीत केवळ एक सांगीतिक निर्मिती नसून,त्यांच्या विचारांना आणि कार्याला वाहिलेली भावपूर्ण आदरांजली ठरत आहे. हे गीत अजितदादांच्या असंख्य समर्थकांच्या भावना व्यक्त करणारे असून, त्यांच्या आठवणी नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र राज्य रुग्णसेवक व श्रमिक कामगार संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी अजय चव्हाण व उपाध्यक्ष पदि अमोल तायडे

**दैनिक युवक अधार**

**मालेगाव तालुका प्रतिनिधी प्रकाश भुरे**

**वाशिम -** महाराष्ट्र राज्य रुग्णसेवक व श्रमिक कामगार संघटनेच्या वाशिम जिल्हाध्यक्षपदी अजय चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आणि उपाध्यक्ष पदि अमोल तायडे यांनी नियुक्ती करण्यात आली आहे सामाजिक कार्यातील योगदानाची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष सुरज एस. यादव यांनी दिलेल्या नियुक्तीपत्रानुसार, संस्थापक अध्यक्ष प्रवीण समाधान भॉटकर यांच्याआदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली. रुग्णसेवा, सामाजिक बांधिलकी आणि श्रमिक कामगारांच्या हक्कांसाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याच्या उद्देशाने त्यांची निवड करण्यात आल्याचे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.

संघटनेच्या नियमांचे पालन करत गरजू रुग्ण आणि श्रमिक कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत आणि



त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सक्रिय भूमिका बजावावी, अशी अपेक्षाही संघटनेने व्यक्त केली आहे. दरम्यान, अजय चव्हाण यांच्या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक

महाराष्ट्र राज्य रुग्णसेवक व श्रमिक राजकीय, कामगार आणि रुग्णसेवा क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील रुग्णसेवा आणि कामगारांच्या प्रश्नांना अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# पावसाच्या सरींमध्ये विठ्ठलनामाचा अखंड जयघोष;
## जि.प. प्राथमिक शाळा पिंपळस रामाचे येथे भक्तिमय आषाढी एकादशी उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळस रामाचे येथे आषाढी एकादशीचा पवित्र उत्सव अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांची पारंपरिक वेशभूषेतील भव्य दिंडी काढण्यात आली. रिमझिम पावसाच्या सरी सुरू असतानाही बालवारकऱ्यांचा उत्साह किंचितही कमी झाला नाही. "ज्ञानोबा-तुकाराम", "पुंडलिक वरदा हरि विठ्ठल" आणि "माऊली माऊली" अशा अखंड नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी हातात टाळ, मृदंग, पखवाज आणि भगवे पताके घेऊन विठ्ठलभक्तीचा संदेश दिला. पावसाच्या सरी अंगावर झेलत



शिस्तबद्ध पद्धतीने काढलेल्या दिंडीमुळे परिसरात जणू पंढरपूरचीच अनुभूती निर्माण झाली. विद्यार्थ्यांच्या निरागस चेहऱ्यावरील भक्तिभाव आणि विठ्ठलनामाचा गजर उपस्थितांचे मन जिंकून गेला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र अहिरे यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व, वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा, संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांच्या विचारांचा वारसा तसेच विठ्ठलभक्तीचे संस्कार यांविषयी मार्गदर्शन केले.

शाळेचे कलाशिक्षक ज्ञानेश्वर उगले यांनी विद्यार्थ्यांना विठ्ठल-रुक्मिणीचे आकर्षक रूप साकारून दिले. कार्यानुभव शिक्षक रमेश उगले यांनी कागदापासून तयार केलेले मुकुट, हार, रुक्मिणीसाठी ताज, पालखी आदी साहित्य तयार करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच क्रीडा शिक्षक विलास गायकवाड यांनी "विठ्ठल विठ्ठल" या भक्तिगीतावर सादर केलेल्या लेझीम सादरीकरणाने उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली.

दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी अभंग, भजन आणि विठ्ठलनामाचा अखंड जयघोष करत संपूर्ण वातावरण भक्तिमय केले. पावसाच्या सरी आणि विठ्ठलनामाचा निनाद यांचा अनोखा संगम अनुभवत उपस्थित पालक, शिक्षक व ग्रामस्थ भारावून गेले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक राजेंद्र अहिरे, ज्ञानेश्वर उगले, रमेश उगले, गोपाळ चव्हाण, संदीप गवते, सौ. संगीता कडलग, निता चौधरी, पल्लवी भडके, शिल्पा बोराडे, ज्योती कोकंदे, सुनिता देवरे, माधुरी साळी, राखी हिरे, सरिता महाजन, विलास गायकवाड आदी शिक्षक-शिक्षिका यांनी विशेष परिश्रम घेतले.

याप्रसंगी पिंपळस रामाचे गावचे सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ना ना मुंदडा विद्यालयात वृक्षदिंडी चे आयोजन

**दैनिक युवक अधार**

**मालेगाव तालुका प्रतिनिधी प्रकाश भुरे :** ना ना मुंदडा विद्यालयात आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील वारकरी परंपरेचा एक भाग म्हणून वृक्षदिंडी काढण्यात आली.



गुरुवार दिनांक 23 जुलै रोजी या दिंडीत लहान लहान चिमुकले विद्यार्थी यांनी वारकरी वेष परिधान केला होता तसेच मुलींनी लुगडे परिधान केले होते टाळ मृदुंग च्या गजरात झाडे लावा हा संदेश देत ही दिंडी ना ना मुंदडा विद्यालयातून गाडगेबाबा नगर परिसरात फिरून ओंकारगिर महाराज मंदिर येथे आली दिंडीला विधिवत वृक्षाची पूजा करून सुरुवात करण्यात आली. दरम्यान झाडे वाचवण्यासाठी वेगवेगळे संदेश तयार करून मुलांनी हातात घेत नागरिकांना दिले तसेच झाडे वाचवण्यासाठी घोषणा देण्यात आल्या अतिशय शिस्तबद्ध रित्या ही पालखी दिंडी गाडगेबाबा नगर परिसरात गेली काही विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी तसेच महाराष्ट्रातील विविध संताच्या भूमिका साकारल्या होत्या. त्याचवेळी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठ्ठल रुक्मिणी यांच्या गाण्यावर नृत्य सादर केले. काही विद्यार्थ्यांनी पावली व फुगडी सुद्धा खेळली संत ओंकारगिर महाराज मंदिरावर गेल्यानंतर अरुण बळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना साठी नाष्ट्याची व्यवस्था केली होती त्यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला गावकऱ्यांनी रांगोळ्या काढून स्वागत केले. परत ही दिंडी ना ना मुंदडा विद्यालयात आली. त्या ठिकाणी परिसरात वृक्षारोपण केले नंतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला मुख्याध्यापक दिनेश कुमार उंटवाल यांच्या मार्गदर्शनात ही दिंडी काढण्यात आली या दिंडीला यशस्वी करण्यासाठी उप मुख्याद्यापिका सौ संध्या उंबरकर पर्यवेक्षक गजानन पाटील सांस्कृतिक प्रमुख अमोल कल्याणकर यांच्यासह विद्यालयातील शिक्षक शिक्षिका यांनी सहकार्य केले. या दिंडीत विद्यार्थ्यांचा खूप उत्साह दिसून आला पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता

# विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी 'तंबाखूमुक्त शाळा' अभियान
## एपीआय गायकवाड यांचे विद्यार्थ्यांना प्रभावी मार्गदर्शन

**दैनिक युवक अधार**

**मालेगाव तालुका प्रतिनिधी प्रकाश भुरे :** मालेगाव येथील ना. ना. मुंदडा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये तंबाखू, गुटखा, सिगारेट व इतर व्यसनांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने 'तंबाखूमुक्त शाळा अभियान' उत्साहात राबविण्यात आले. या अभियानांतर्गत शाळा परिसरात धूम्रपान निषेध क्षेत्र व तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था असे फलक लावण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनाचा संदेश देण्यात आला.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले एपीआय गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत तंबाखू, गुटखा, सिगारेट आणि इतर व्यसनांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम अत्यंत प्रभावीपणे समजावून सांगितले.




व्यसन हे केवळ आरोग्याचे नव्हे तर संपूर्ण कुटुंबाच्या भवितव्याचे नुकसान करणारे आहे. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहून शिक्षण, संस्कार आणि चांगल्या सवयींना प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद इम्रान खान (रिपोर्टर) आणि तसेच पत्रकार सोनू अहीर यांनीही विद्यार्थ्यांना व्यसनमुक्ती, आरोग्यदायी जीवनशैली आणि सामाजिक जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत तंबाखूमुक्त समाज घडविण्याचा संकल्प केला.कार्यक्रमास गजानन पाटील, राजपूत मॅडम, शिवा काळे, जितू पाटील कुंबळकर, एपीआय गायकवाड, शाळेचे शिक्षक, विद्यार्थी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.व्यसनमुक्त विद्यार्थी – सुदृढ समाज हा संदेश देत पार पडलेले हे अभियान विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणारे आणि समाजात तंबाखूमुक्त वातावरण घडविण्यासाठी प्रेरणादायी ठरले.

# राज्यपालांच्या उपस्थितीत १६७वा आयकर दिन साजरा

**मुंबई :** तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पारदर्शकता वाढवून, कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करून आणि करदात्यांचा विश्वास संपादन करून स्वतःला जनस्नेही संस्थेमध्ये रूपांतरित केल्याबद्दल राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आयकर विभागाचे अभिनंदन केले. 'एकेकाळी 'भीतीदायक' म्हणून ओळखला जाणारा आयकर विभाग आज 'जनस्नेही मित्र' बनला आहे,"असे गौरवोद्गार राज्यपालांनी यावेळी काढले. राज्यपालांच्या उपस्थितीत आयकर विभागाचा १६७ वा स्थापना दिवस विभागाच्या मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलातील कौटिल्य भवन येथे संपन्न झाला त्यावेळी ते बोलत होते.

भारत ५ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत असताना आयकर विभागाचे योगदान अधिक महत्वाचे असल्याचे राज्यपालांनी सांगितले. कर महसुलामुळे देशात सार्वजनिक शाळा, रुग्णालये, रस्ते, पायाभूत सुविधा तसेच विविध कल्याणकारी योजनांची उभारणी शक्य झाली असून, देशाच्या प्रगतीत विभागाचे योगदान मोलाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. देशातील प्रत्यक्ष कर संकलनात महाराष्ट्राचा सर्वाधिक वाटा असून, मुंबईने देशाची आर्थिक राजधानी म्हणून आपले स्थान कायम राखले असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

मुंबई मेट्रो, कोस्टल रोड प्रकल्प, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक तसेच मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्ग यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प हे करदात्यांच्या योगदानाचे जिवंत उदाहरण असल्याचे सांगून, या प्रकल्पांमुळे वाहतूक व्यवस्था, संपर्क, आर्थिक विकास आणि भविष्यासाठी सक्षम शहर उभारण्यास मोठी चालना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. 'अग्रीम कर' हा देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देत असल्याचे सांगून प्रत्येक करदात्याने अग्रीम कर आपली सामाजिक जबाबदारी समजून भरावा, असे आवाहन केले.

मुंबईचे प्रधान मुख्य आयकर आयुक्त आलोक कुमार यांनी आयकर विवरणपत्र दाखल करण्याची प्रक्रिया आता ऑनलाइन खाद्यपदार्थ मागविण्याइतकी सुलभ झाल्याचे सांगितले. २०१९ मध्ये आयकर विवरणपत्रावर प्रक्रिया करण्यासाठी ८२ दिवस लागत असताना आज ती काही दिवसांत पूर्ण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. परताव्याची (रिफंड) रक्कमही अत्यंत जलद दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आयकर विभाग सर्व शासकीय विभागांमध्ये आघाडीवर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# पनवेल तहसील सेतू कार्यालयात एजंटांचा सुळसुळाट; नागरिकांची लूट अन् अधिकाऱ्यांवर दबाव!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल तहसील कार्यालयातील 'सेतू' सुविधा केंद्र सध्या नागरिकांच्या मदतीसाठी की एजंटांचे खायचे दुकान, असा सवाल उपस्थित होत आहे. सेतू कार्यालयाच्या आवारात एजंटांचा प्रचंड सुळसुळाट वाढला असून, नागरिकांची उघडउघड अडवणूक आणि फसवणूक करून मलाई लाटण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत.

**अर्जदार गायब, एजंटच झाले 'मालक'!**

विविध दाखले, कागदपत्रे आणि शासकीय कामांसाठी येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना सरळ मार्गाने काम करणे कठीण झाले आहे. "आम्ही अधिकाऱ्यांच्या ओळखीचे आहोत, तुमचे काम एका दिवसात करून देतो," असे सांगून एजंट नागरिकांकडून हजारो रुपये उकळत आहेत.

> ग्रामीण भागातून किंवा दूरवरून येणाऱ्या अशिक्षित व गरजू नागरिकांना कार्यालयाच्या परिसरात उभे राहून फॉर्म भरण्यास मदत करतो सांगून नागरिकांना जाळ्यात ओढले जाते ऑनलाईन करण्यास ठराविक सेवा केंद्राकडे पाठवून तेथे 3 ते 4 हजार उकळले जात आहे. सर्वसामान्य अर्जदारांची मोठी आर्थिक फसवणूक होत असून, प्रशासनाच्या प्रतिमेलाही मोठा धक्का बसत आहे.'तहसील सेतू येथील रेशन कार्ड एजंट यांना प्रशासनाने यावर तात्काळ चाप लावावा.'
>
> — पीडित नागरिक

विशेष म्हणजे, पुरवठा कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांना या बाबत विचारणा केली असता कर्मचारी नियमानुसार मूळ अर्जदाराची मागणी करतात, तेव्हा "अर्जदार आले नाहीत, आम्ही त्यांचेच काम घेऊन आलोय,आम्ही सामाजिक कामे करतो काम करूनच द्या!" अशी अरेरावी हे एजंट कार्यालयात करतात असे सांगितले आहे. ओळखीचा सुगावा देऊन आणि राजकीय किंवा इतर दबाव आणून कामे पदरात पाडून घेण्याचा सपाटा या एजंटांनी लावला आहे.

काम नसेल होत तर क्लायंट ला खिडकीत पाठवून गर्दी केली जाते. कागदपत्रांची पातळीची प्रक्रियेत चुकामूक झाल्याने बांगलादेशी रेशन कार्ड कसे बनतात ह्याचे उदाहरण दिसते.

या बाबत पुरवठा कार्यालयात अनेकदा विवाद होताना दिसले आहे. या त्रासाबद्दल कार्यालयाने वरीष्ठना माहिती दिली असल्याचे समजते

शासकीय नियमांनुसार अत्यंत कमी शुल्कात होणाऱ्या कामांसाठी हे एजंट च्या संगनमताने महा ई सेवा केंद्र सामान्य नागरिकांची आर्थिक फसवणूक करत जनतेकडून अव्वाच्या सव्वा पैसे वसूल करत आहेत.

नवीन रेशनकार्ड आता शासकीय rcms संकेतस्थळा वरुन सुविधा मिळाली मात्र ह्याचा फायदा महा ई सेवा केंद्र घेत आहेत. ह्यावर कोणाचेही नियंत्रण नाही असे दिसते आहे.

**प्रशासनाकडून कडक कारवाईची मागणी**

या प्रकारामुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही नाहक ताण येत असून, अरेरावी करणाऱ्या एजंटांवर प्रशासनाने आणि पोलिसांनी कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

सेतू आवारात रोज दिसणारे एजंटांच्या वावरावर त्वरित बंदी घालावी.फक्त मूळ अर्जदारांनाच प्रत्यक्ष उपस्थितीत प्रवेश द्यावा.

महा इ सेवा केंद्राला शासनाने ऑनलाईन शुल्क मर्यादा जिल्हाधिकारी कडून ठरवून द्यावी.

दलालांची अरेरावी थांबवण्यासाठी सीसीटीव्ही (CCTV) आणि सुरक्षा रक्षक तैनात करावेत अशी मागणी होऊ लागली आहे

# देशाच्या राजधानीत पत्रकारांचा राष्ट्रीय मेळावा
## दिल्लीत २७ व २८ जुलै रोजी व्हॉईस ऑफ मीडिया राष्ट्रीय अधिवेशन

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी :** देशातील पत्रकारांच्या प्रश्नांवर व्यापक चर्चा घडवून आणण्यासाठी आणि पत्रकारितेच्या भविष्यासंदर्भात दिशा ठरविण्यासाठी व्हॉईस ऑफ मीडिया (व्ही ओ एम ) व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम यांच्या वतीने २७ व २८ जुलै रोजी नवी दिल्ली येथील विश्व युवा केंद्र येथे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत होणाऱ्या या अधिवेशनात देशभरातील विविध राज्यांतील प्रदेशाध्यक्ष, पदाधिकारी, ज्येष्ठ पत्रकार आणि माध्यम क्षेत्रातील मान्यवर सहभागी होणार आहेत.




अधिवेशनादरम्यान पत्रकार संरक्षण, पत्रकारिता क्षेत्रातील बदलते आव्हान, डिजिटल माध्यमांचे वाढते महत्त्व, पत्रकारांच्या सामाजिक सुरक्षा योजना, कौशल्य विकास, पत्रकार स्वातंत्र्य, माध्यमांची विश्वासार्हता आणि पत्रकार कल्याण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे. विविध सत्रांमध्ये देशातील अनुभवी व नामवंत पत्रकार उपस्थितांना मार्गदर्शन करणार असून, राज्यनिहाय अनुभव आणि उपक्रमांची देवाणघेवाणही केली जाणार आहे.

या राष्ट्रीय अधिवेशनात पत्रकारांच्या हिताशी संबंधित ३० महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात येणार असून, ते केंद्र सरकारकडे सुपूर्त केले जाणार आहेत. पत्रकारांच्या समस्या आणि अपेक्षा राष्ट्रीय स्तरावर प्रभावीपणे मांडण्याच्या दृष्टीने हे अधिवेशन महत्त्वाचे मानले जात आहे.

व्हॉईस ऑफ मीडिया, व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमचे संस्थापक तथा आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे आणि राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के यांनी देशभरातील निमंत्रित प्रतिनिधी, पत्रकार आणि पदाधिकाऱ्यांना या राष्ट्रीय अधिवेशनात उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. पत्रकारांच्या एकजुटीला बळ देणारे आणि भविष्यातील दिशा ठरविणारे हे अधिवेशन देशातील माध्यम क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# 26 दिवसांनंतर सोनम वांगचुक यांचे उपोषण मागे; केंद्र सरकारकडून तीन महत्त्वाच्या आश्वासनांनंतर निर्णय

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- मयुर धुरी (दादर मुंबई) :** नीट पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई, शिक्षण व्यवस्थेत सुधारणा आणि आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील कारवाई टाळण्याच्या केंद्र सरकारच्या आश्वासनानंतर सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी तब्बल 26 दिवसांनंतर आपले उपोषण मागे घेतले.

सोनम वांगचुक यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत उपोषण संपवण्याची माहिती दिली. केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा, केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह तसेच लेह-लडाख सर्वोच्च समितीच्या वरिष्ठ नेत्यांशी झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

वांगचुक यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, विविध राजकीय पक्षांच्या 65 खासदारांनी भेट घेऊन किंवा पत्राद्वारे उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती. केंद्र सरकारसोबत अनेक अटींवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर आणि देशात संभाव्य हिंसाचार टाळण्याच्या दृष्टीने उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारसोबत झालेल्या करारातील



अटींबाबत लवकरच स्वतंत्र व्हिडिओद्वारे माहिती देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्यरात्री एक व्हिडिओ संदेश प्रसिद्ध करून नीट पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याचे तसेच शिक्षण व्यवस्थेबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर काही वेळातच वांगचुक यांनी उपोषण समाप्त करण्याची घोषणा केली.

केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि डॉ. जितेंद्र सिंह यांनी रुग्णालयात जाऊन सोनम वांगचुक यांची भेट घेत सरकारची भूमिका स्पष्ट केली. सरकारने तीन महत्त्वाच्या बाबींवर सकारात्मक भूमिका घेतल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

**सरकारची प्रमुख आश्वासने :**

20 जुलै रोजी शांततेत आंदोलन करून संसदेकडे मोर्चा काढणाऱ्या विद्यार्थ्यांवर कोणताही गुन्हा दाखल केला जाणार नाही.

नीट पेपरफुटी प्रकरण आणि शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांवर संसदेत चर्चा करण्यास सरकार तयार आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देण्याबाबतही विचार केला जाईल.

जंतरमंतर येथे जवळपास महिनाभर सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान सरकार आणि आंदोलकांमध्ये अनेक फेऱ्यांच्या चर्चा झाल्या होत्या. अखेर विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई होणार नसल्याचे आश्वासन आणि इतर मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेतल्यानंतर सोनम वांगचुक यांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला.



# विमलेश्वरची जादू

प्रत्येक पावसाळ्यात कोकण एखाद्या हिरव्या स्वप्नासारखा खुलतो. या स्वप्नवत निसर्गात दडलेलं देवगडचं विमलेश्वर मंदिर इतिहास, अध्यात्म आणि निसर्गप्रेमींसाठी एक अनमोल ठेवा आहे.

पावसाळ्यात कोकणच्या वाटांनी प्रवास करणं म्हणजे मनाला एका वेगळ्याच विश्वात घेऊन जाण्यासारखं असतं. निसर्गाचं हे देखणं रूप अनुभवायला मी नेहमीच उत्सुक असते. अशाच एका सुखावणाऱ्या पावसाळी सकाळी मी कोकणातल्या एका अत्यंत गूढ, निसर्गरम्य आणि अद्भुत मंदिराचा अनुभव घेण्यासाठी प्रवासाला निघाले.

तुमच्यापैकी बऱ्याच जणांनी मला या जागेबद्दल सुचवलं होतं आणि गुगलवर काही महिन्यांपूर्वी त्या ठिकाणाचे फोटोज पाहिले होते, तेव्हापासूनच विमलेश्वरला जाण्याचं मनात पक्कं केलं होतं. पावसाने थोडी उसंत घेतली होती, त्यामुळे आम्ही गाडी थेट विमलेश्वरच्या दिशेने वळवली. देवगडपासून विमलेश्वरपर्यंतचा हा दहा किलोमीटरचा रस्ता अत्यंत रम्य आहे. वाटेत सुंदर असा वाडातरचा पूल लागतो, रस्त्याच्या दुतर्फा हिरवीगार भातशेती पाहत, निसर्गाची जादू डोळ्यांत साठवत आम्ही कधी पोहोचलो ते आम्हाला समजलंच नाही.

विमलेश्वर मंदिराच्या परिसरात पोहोचले आणि वाटेतली दृश्यं पाहून मन थक्क झालं. समोर एक भव्य कमान दिसत होती आणि तिथून खाली उतरणाऱ्या पायऱ्या होत्या. आम्ही जशा पायऱ्या उतरत गेलो, तसा पाण्याचा मंजूळ आवाज कानावर पडू लागला. आजूबाजूला पाहिलं तर तो जांभ्या दगड पाहून असं वाटत होतं की, हे संपूर्ण मंदिर आणि परिसर जांभ्यात खोदूनच काढलाय की काय!

पायऱ्या उतरून खाली आल्यावर बाजूलाच काही प्राचीन विरगळ दिसल्या. तिथेच एक नळ होता. तिथे हात-पाय धुवून पुढे जाण्याची एक सूचना लिहिली होती. त्यामुळे आधी व्यवस्थित हात-पाय धुतले. समोरच 'कालभैरव गुंफा' असं लिहिलेलं दिसलं आणि आम्ही त्या गुहेत प्रवेश केला. त्या छोट्याशा जागेत एक प्रसन्न पिंडी होती. संपूर्ण गुहेत फुलांचा पवित्र गंध भरून राहिला होता.

गुहेतून बाहेर आल्यावर समोरच एक सुंदर तुळशी वृंदावन दिसलं. या तुळशी वृंदावनाच्या अगदी समोर आणि गुहेला लागूनच गणपती बाप्पाचं एक छोटं आणि देखणं मंदिर आहे. बाप्पाचं दर्शन घेऊन थोडं पुढे आल्यावर लगेच विमलेश्वराचं मुख्य मंदिर डोळ्यांसमोर येतं.

हे मुख्य मंदिर पूर्णपणे कातळात साकारलेलं आहे. मंदिराच्या समोर तीन दीपमाळा डौलाने उभ्या आहेत आणि बाजूला दोन हत्तींची शिल्प आहेत. पण त्या हत्तींच्या शिल्पकलेविषयी मला एक मोठं कुतूहल वाटलं. त्या हत्तींचा पुढचा भाग एकदम नवीन वाटत होता, पण मागचा भाग मात्र मूळ जांभ्या दगडाचाच आहे. हे शिल्प त्याचवेळी कोरलं गेलंय की नंतर डागडुजी केली आहे, हे मात्र कळत नव्हतं.

मंदिराजवळ गेले तशी वरती असलेली शिल्पं पाहिली, ती पंचतत्त्वाची प्रतीकं आहेत असं म्हणतात. पण मंदिराच्या गाभाऱ्यात जाताना मात्र मनात थोडी धाकधूक होत होती. आत जायची खूप भीती वाटत होती, कारण तिथे कित्येक वटवाघळांचा सहवास होता आणि त्यांचा आवाज तिथे प्रचंड घुमत होता. तरीही धीर करून पायऱ्या चढून गेले. वर पाहिलं तर झुंबरासारखी उलटी लटकलेली कित्येक वटवाघळं दिसत होती. अगदी पाच-पाच, सहा-सहाच्या ग्रुपने ती फिरत होती.

मंदिरात प्रवेश करताच पहिल्यांदा नंदीचं दर्शन झालं. तिथून पुढे पायऱ्या चढून वर गेल्यावर गाभाऱ्यात विमलेश्वराची ती भव्य शिवपिंड दिसली. शांतपणे दर्शन घेतलं आणि वटवाघळांच्या आवाजाचा थरार अनुभवत बाहेर आले.आम्ही मंदिरातून बाहेर पडलो तेव्हा संध्याकाळ होत चाललेली. सगळी जनावरं गोठ्याकडे परतत होती आणि त्यांची वाट मंदिराच्या परिसरातूनच जात होती. मंदिराच्या पाठीमागच्या बाजूला काही पायऱ्या खाली गेल्या होत्या, तिथून आम्ही खाली उतरलो. समोर पाणी साठवलेली दोन कुंडं दिसली. वरून येणारा पाण्याचा प्रवाह पहिल्यांदा एका कुंडात जातो, तिथून थोडं पाणी साठून ते दुसऱ्या कुंडात आणि मग पुढे वाहून जातं. उन्हाळ्यात पाणी कमी झाल्यावर लोक याच कुंडातील पाण्याचा वापर करतात.

पायऱ्या उतरल्यावर बाजूला पाहिलं तर एक विलक्षण दृश्य दिसलं. तिथे एक गोमुख होतं आणि त्या गोमुखातून पाण्याची पवित्र धारा अखंड वाहत होती. जणू काही एखादा गुप्त खजिनाच सापडल्याचा आनंद मला झाला. त्या पायऱ्यांवर मी काही वेळ शांत बसून राहिले. पाठीशी ते सुंदर पुरातन मंदिर, समोर झाडावेलींच्या सान्निध्यातून खळखळत वाहणारा झरा आणि लांबवर दिसणारी नारळापोफळीची उंचच उंच झाडं... एखाद्याचं सहज ध्यान लागून जाईल अशी तिथली शांतता होती.

त्यानंतर समोरच्या पुलाकडे जाण्यासाठी निघाले. पुलावरून वरून जाता येत होतं, पण मला त्या झऱ्याच्या थंडगार पाण्यातून चालत जाण्याचा मोह आवरला नाही. पायाला स्पर्श करणाऱ्या त्या थंडगार पाण्याच्या प्रवाहात जात असताना आजूबाजूला माडाची, सुपारीची सुंदर कुळागरं दिसत होती. समोरच जांभ्या दगडाचा एक देखणा पूल होता.

या जांभ्याच्या पुलावर उभं राहिल्यावर जाणीव होते की, हे विमलेश्वर मंदिर निसर्गाचा किती सुंदर अविष्कार आहे. पुलावर उभे राहून जेव्हा मी विमलेश्वर मंदिराचा संपूर्ण परिसर निरखिला, तेव्हा डोक्यातले सगळे विचार शांत झाले होते. समोर कातळातलं मंदिर, पाठीमागून वाहणारा झरा आणि त्याला जोडणारा हा पूल... पावसाळ्यात तर या पुलावर हिरवं आल्गी (शेवाळ) जमा झाल्यामुळे हा परिसर आणखीनच मनमोहक आणि सिनिक दिसतो. विमलेश्वरचा खरा आनंद घ्यायचा असेल, तर तो पावसाळ्यातच घ्यायला हवा, हे मात्र नक्की! देवगडची ही पावसाळी भटकंती मनाला तृप्त करून गेली.

जाण्यासाठी मार्ग : मुंबई-गोवा महामार्ग.

कोल्हापूरवरून फोंडाघाट किंवा करूळ घाट मार्गे.

जवळचे बसस्थानक : देवगड.

जवळचे रेल्वेस्थानक : कणकवली, वैभववाडी.

**मुक्ता नार्वेकर**
**ट्रॅव्हल व्लॉगर**

# आषाढीची वारी : विठ्ठलभक्ती, निसर्ग आणि माझा सुरू असलेला आत्मशोध

पहाट अजून पूर्ण उजाडलेली नसते. क्षितिजावर प्रकाशाची केवळ एक नाजूक रेषा उमटलेली असते. रात्र आणि दिवस यांच्या सीमेवर उभ्या असलेल्या त्या शांत क्षणी सृष्टी हळूहळू जागी होत असते. दवबिंदूंनी नटलेली गवताची पाती, मातीतून दरवळणारा ओलसर सुगंध, पक्ष्यांचा मधुर किलबिलाट आणि मंद वाऱ्याच्या झुळुकीसोबत कानावर येणारा टाळांचा पहिला नाद... त्या नादात क्षणोक्षणी भर पडत जाते आणि मग हजारो कंठातून एकच स्वर अवकाशात घुमतो—" ज्ञानोबा... तुकाराम...!"

माझ्यासाठी हा केवळ जयघोष नाही; तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक स्मृतीचा स्पंदनशील श्वास आहे.

लाखो पावले एकाच दिशेने पुढे सरकत असतात. कोणाच्या गळ्यात तुळशीची माळ असते, कोणाच्या खांद्यावर भगवी पताका, कोणाच्या हातात टाळ, तर कोणाच्या ओठांवर अखंड नामस्मरण. त्या गर्दीत शेतकरी असतो, शिक्षक असतो, उद्योगपती असतो, मजूर असतो; पण वारीत सहभागी झाल्यानंतर या सर्व ओळखी मागे पडतात. त्या क्षणी उरते ती एकच ओळख—"मी वारकरी."

मी अनेक वर्षे वारीचे निरीक्षण करत आलो आहे. प्रत्येक वर्षी एखादे नवीन दृश्य मनाला स्पर्श करून जाते. एखादा तरुण थकलेल्या वृद्ध वारकऱ्याचा हात धरून चालताना दिसतो. एखादे कुटुंब आपल्या घराचे अंगण पूर्णपणे अनोळखी वारकऱ्यांसाठी खुले करते. कोणी पाण्याचा घोट देतो, कोणी महाप्रसाद वाढतो, तर कोणी फक्त हसून पुढे जाणाऱ्याचे स्वागत करतो. या छोट्या घटना पाहताना मला वारंवार जाणवते की वारीची खरी ताकद केवळ तिच्या संख्येमध्ये नाही; ती माणसामाणसांमध्ये निर्माण होणाऱ्या विश्वासात आहे.

याच अनुभवामुळे माझ्या मनात एक विचार अधिक दृढ होत गेला. भारतीय संस्कृतीत अनेक तीर्थयात्रा, अनेक उत्सव आणि अनेक धार्मिक परंपरा आहेत. तरीही माझ्या अनुभवात आषाढीची वारी वेगळी भासते. कारण ही यात्रा केवळ पंढरपूरकडे जाणारी वाट नाही; ती माणसाला स्वतःकडे पाहण्याची संधी देते. अहंकारापासून नम्रतेकडे, स्वार्थापासून सहजीवनाकडे आणि व्यक्तिकेंद्रित जीवनापासून विश्वकुटुंबाच्या




भावनेकडे नेणारा हा एक सामूहिक अनुभव आहे.

म्हणूनच माझ्या दृष्टीने वारी हा केवळ धार्मिक सोहळा नाही. ती भारतीय संस्कृतीचे चालते-बोलते विद्यापीठ आहे. येथे अभ्यासक्रम नाही, परीक्षा नाही आणि पदवीही नाही; पण आयुष्य समजून घेण्याची संधी आहे. येथे प्रवचनापेक्षा आचरण अधिक बोलते आणि उपदेशापेक्षा अनुभव अधिक प्रभावी ठरतो. प्रत्येक वारकरी नकळत दुसऱ्याचा शिक्षकही असतो आणि विद्यार्थीही.

आज आपण विकासाची व्याख्या उंच इमारती, आधुनिक तंत्रज्ञान, वेगवान वाहतूक आणि आर्थिक प्रगती यांमधून करतो. या सर्व गोष्टी निश्चितच आवश्यक आहेत. परंतु भारतीय संस्कृतीने विकासाचा आणखी एक पैलू मांडला आहे. माणूस बाहेरून किती मोठा झाला, यापेक्षा तो आतून किती समृद्ध झाला; त्याने किती मिळवले, यापेक्षा किती वाटले; आणि निसर्गावर किती नियंत्रण मिळवले, यापेक्षा निसर्गाशी किती सुसंवाद साधला—यालाही तितकेच महत्त्व दिले गेले. माझ्या आकलनानुसार, वारी या प्रश्नांची तयार उत्तरे देत नाही; ती त्या प्रश्नांकडे नव्या दृष्टीने पाहण्याची प्रेरणा देते.

भारतीय तत्त्वज्ञानात यात्रा ही केवळ भौगोलिक प्रवास नसून अंतर्मनाच्या शुद्धीची प्रक्रिया मानली गेली आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या तत्त्वज्ञानातून जीवन आणि अध्यात्म यांना कधीही परस्परांपासून वेगळे केले नाही. त्यांच्या दृष्टीने प्रत्येक जीव, प्रत्येक वनस्पती, प्रत्येक नदी, प्रत्येक पर्वत आणि प्रत्येक मानव हा एका अखंड चैतन्याचा भाग आहे. त्यामुळे परमेश्वराचा शोध केवळ मंदिरापुरता मर्यादित राहत नाही; तो संपूर्ण सृष्टीत विस्तारतो. माझ्या अनुभवात हीच भावना वारीच्या प्रत्येक पावलात जाणवते.

वारकरी चालतो तेव्हा तो एकटा चालत नाही. त्याचे पाऊल दिंडीच्या लयीत मिसळते, त्याचा श्वास अभंगांच्या स्वरांत गुंफला जातो, त्याचा थकवा सहप्रवाशांच्या सहवासाने हलका होतो आणि महाप्रसादामध्ये त्याची भूक भागते. त्या प्रवासात आनंद आणि दुःखही वैयक्तिक राहत नाहीत. 'मी'चे 'आपण' होण्याची ही प्रक्रिया माझ्या मते वारीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे.

आजच्या काळात संवादाची साधने प्रचंड वाढली आहेत; पण मनांमधील संवाद कमी झाल्याची खंत अनेकदा व्यक्त केली जाते. अशा काळात लाखो अपरिचित लोक कोणत्याही निमंत्रणाशिवाय, कोणत्याही प्रसिद्धीशिवाय आणि कोणत्याही मोबदल्याशिवाय एकाच ध्येयाने एकत्र चालतात, ही घटना मला केवळ धार्मिक परंपरा वाटत नाही; ती मानवी समाजातील परस्परविश्वासाची आणि सांस्कृतिक एकात्मतेची जिवंत अभिव्यक्ती वाटते. एवढ्या मोठ्या जनसमुदायात बाह्य नियंत्रण अत्यल्प असूनही व्यवस्था टिकून राहते. यामागे केवळ नियम नाहीत; संस्कारांचीही मोठी भूमिका आहे, असे मला वाटते. श्रद्धा तिची शिस्त आहे, सेवा तिची व्यवस्था आहे आणि समता तिचा आत्मा आहे.

याच संदर्भात पंढरपूरच्या श्रीविठ्ठलांची प्रतिमा मला नेहमीच विशेष अर्थपूर्ण वाटते. भारतीय देवतांच्या अनेक प्रतिमांमध्ये वैभव, अलंकार आणि सामर्थ्याची रूपे दिसतात; परंतु श्रीविठ्ठल साध्या विटेवर उभे आहेत. कमरेवर हात ठेवून ते भक्तांची प्रेमाने वाट पाहत उभे आहेत. त्यांच्या मुखमुद्रेवर अधिराज्याचा अभिमान नाही; तर आपलेपणाचा भाव आहे. माझ्या आकलनानुसार, या प्रतिमेत भारतीय संस्कृतीच्या जीवनदृष्टीचे अनेक पैलू प्रतिबिंबित होतात.विट मातीपासून घडते. मातीशिवाय विट नाही आणि विटेशिवाय श्रीविठ्ठलांची ही प्रतिमा पूर्ण होत नाही. या प्रतीकातून मला असा संदेश जाणवतो की सृष्टीपासून वेगळे होऊन परमेश्वरापर्यंत पोहोचता येत नाही. ज्या भूमीवर आपण चालतो, ज्या पाण्याने आपली तहान भागते, ज्या अन्नाने आपण जगतो आणि ज्या वायूने आपण श्वास घेतो, त्यांच्याशी कृतज्ञतेचे नाते जोडल्याशिवाय भक्तीही पूर्णत्वास जात नाही.भारतीय संस्कृतीतील ही जीवनदृष्टी एका दिवसात निर्माण झालेली नाही. तिच्यामागे हजारो वर्षांचे चिंतन, अनुभव आणि सामाजिक व्यवहार आहे. माझ्या अभ्यासातून आणि अनुभवातून मला असे जाणवले की आपल्या पूर्वजांनी मानव आणि निसर्ग यांच्यातील नाते केवळ उपयुक्ततेवर उभारले नाही; त्यांनी ते कृतज्ञतेवर आधारले. माणूस ज्या गोष्टीशी भावनिक नाते जोडतो, तिचे संरक्षण तो अधिक सहजपणे करतो, हा मानवी स्वभाव त्यांनी ओळखला असावा.

आज आपण पर्यावरण संवर्धनासाठी कायदे करतो, धोरणे आखतो, संशोधन करतो आणि विविध मोहिमा राबवतो. हे सर्व आवश्यकच आहे. पण माझ्या मनात अनेक वर्षांपासून एक प्रश्न सतत येत राहिला—आधुनिक पर्यावरणशास्त्राची साधने उपलब्ध नसताना आपल्या समाजाने निसर्गाशी इतके दीर्घकाळ संतुलित नाते कसे जपले असेल?या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा माझा प्रवास पुढे केवळ पर्यावरणापुरता मर्यादित राहिला नाही. तो मला आपल्या संस्कृतीकडे, संतपरंपरेकडे आणि मानवी वर्तनाच्या अभ्यासाकडे घेऊन गेला. त्या प्रवासाने माझ्या विचारांची दिशा बदलली. त्या प्रवासाचीच पुढची कहाणी पुढील भागात आहे.

**विजयकुमार कट्टी**

# आषाढी वारी: भक्ती, शक्ती आणि समतेचा महासंगम

श्रीक्षेत्र पंढरपूरचा लोकदेव विठोबा हा गरिबांचा देव आहे. द्वारकेचा राणा तिकडचे ऐश्वर्य त्यानें सोडून दिलें आणि "देव भावाचा लंपट । सांडून आलासे वैकुंठ ॥"अशी नोंद पुराणात आहे. वारकरी पंथ हा अडाणी लोकांचा पंथ आहे, असा पुष्कळांचा समज आहे; पण त्यांत तिळमात्र तथ्य नाहीं. भोळीभाबडी भक्ति हाच त्या पंथाचा आधार असल्यामुळे हजारों लोक गेली शेकडो वर्षे दरवर्षी आषाढी -कार्तिकी वारीच्या निमित्ताने त्यांत सामील होत असतात. वारकरी पंथांत विठ्ठलभक्तीचा महिमा विशेष आहे. निवृत्तिनाथ ते निळोबा अशी वारकरी परंपरा आहे. या पंथानें विद्वत्तेचें अवडंबर माजविलें नाहीं हे खरें; परंतु त्यानें अंधभक्तीलाहि कोठेंच थारा दिलेला नाहीं. वात्सल्य, दयाशीलता, सहिष्णुता, क्षमाशीलता इत्यादि गुणांनीं तो संपन्न आहे. विठाई ही खरी अनाथांची माउली आहे. म्हणूनच तिच्याशी प्रेमानें सलगी करतांना भक्तांना कधीं संकोच किंवा भीति वाटत नाहीं. ''ज्ञानदेव तु कैवल्यम्' हे वेदान्ताचें मुख्य सूत्र त्यानें कधींहि सोडलें नाहीं. नामसंकीर्तनासारख्या सहजसुलभ साधनाचा त्यानें उदोउदो केला; पण साधनाच्या दृष्टीनें ही केवळ पहिली पायरी आहे हें त्यानें वारंवार व निक्षून सांगितलें आहे. वारकरी संप्रदाय अद्वैती असल्यामुळे अद्वैत तत्त्वज्ञानाचे निरूपण असलेले सर्व ग्रंथ वारकऱ्यांना शिरोधार्य आहेत. त्यातही गीता आणि भागवत हे दोन्ही ग्रंथ वारकऱ्यांच्या नित्य पठणात असतात. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत इत्यादी श्रेष्ठ ग्रंथ वारकऱ्यांना पवित्र आहेत. 'गीता भागवत करिती श्रवण। अखंड चिंतन विठोबाचे ॥' अशी वारकऱ्याची महत्त्वाची खूण तुकाराम महाराजांनी सांगितली आहे. त्याशिवाय ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वरांचे अन्य सर्व ग्रंथ, नामदेव महाराजांची अभंग गाभा, एकनाथ महाराजांचे एकनाथी भागवत म्हणजेच भागवताच्या एकादश स्कंदावरील टीका, तुकाराम महाराजांची अलौकिक गाथा, नाथांचेच भावार्थ रामायण आणि या सर्वांच्या जोडीला वारकरी संप्रदायाच्या सर्व संतांची अभंग रचना वारकऱ्याला प्रमाण आहे. त्या सर्व संतांची अभंगसंपदा सर्व वारकऱ्यांना अत्यंत प्रिय आहे. आपल्या ग्रंथातून सर्व संतांनी अद्वैत तत्त्वज्ञानच सांगितले आहे. ज्ञानेश्वरी आणि तुकोबांची गाथा ही वारकऱ्यांना सर्वाधिक प्रिय म्हणावी लागतील. त्याखालोखाल नाथांचे भागवत येते. यांच्या तुलनेत नामदेव महाराजांची अभंगसंपदा मात्र काहीशी उपेक्षित राहिली. नामदेवांच्या बाबतीत झालेली उपेक्षा दुसऱ्या भक्तिखंडात विशेष करून प्रस्तावनेत आली आहे. परंतु सर्व संतांचे अभंग वारकऱ्यांना प्रिय असतात वारकरी पंथ हा सर्वसंग्राहक आहे. त्यानें संकुचित सांप्रदायिकता बाळगली नाहीं, प्रतीकाचा दुराग्रह धरला नाहीं, दैवतावर रणें माजविली नाहींत. परमेश्वर सर्वव्यापी आहे व तो विविध रूपांनी नटलेला आहे; "तुका म्हणे हरि। अवघा एकला ॥ परी हा धाकुला। भक्तीसाठीं ॥" म्हणून उपासकांची भावनाच मुख्य आहे, प्रतिमा गौण आहे, याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे राम, कृष्ण, दत्त, शिव इत्यादि दैवतांच्या भक्तांना त्यांनी आपल्यांत सामावून घेतले. वारकरी संतांनी तर नेहमींच विष्णु व शिव यांच्या ऐक्यावर भर दिला आहे. "शिव मस्तकी धरिला। भेद मक्तांचा काढिला ॥" लक्षावधी शूद्राशूद्राना या दयामय दैवतानें आत्मोद्धाराची प्रेरणा दिली आहे, बंधुभावाचे पाठ दिले आहेत. मात्र संतांच्या मताप्रमाणे 'विठोबा हा वारकऱ्यांच्या दृष्टीने राम, कृष्ण व विठ्ठल हे तिथेहि एकाच परमेश्वराचे अवतार आहेत.


लोकांत श्रद्धा होतीच, तिला संतांनी डोळसपणा आणला. बहुजनसमाजाच्या आत्मिक उन्नतीसाठीं त्यांनी वारकरी पंथाला नवें वळण लावलें. संत ज्ञानेश्वर हे वास्तववादी धर्मसुधारक होते. महाराष्ट्रातील सर्वच संतांनी अध्यात्मविद्या ही आतां केवळ दशग्रंथी ब्राह्मणांची मिरास राहिली नाहीं. वारकरी पंथानें संतांनीच निर्माण केलेल्या ग्रंथसाहित्यातून लोकांतून धर्मप्रवक्ते तयार केले. "आम्हां 'कीर्तन' कुळ धाडी" अश्या भावनेनें ते आपला जन्मसिद्ध हक्क गाजवू लागले. संत ज्ञानेश्वरांच्या भावार्थ दीपिकेनें या लोकांना कवित्वाची प्रेरणा, तशीच कीर्तनाची स्फूर्ति दिली. "वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। येरांनी वाहावा भार माथां !" असें आव्हानपूर्वक म्हणण्याइतका आत्मविश्वास संत तुकारामांसारख्या कुणब्याने सर्वदूर महाराष्ट्रात विविध ठिकाणी उत्पन्न झाला.वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा संप्रदाय असल्यामुळे पंढरीच्या वारीसाठी सर्व महाराष्ट्रातून अनेक दिंड्या व फड वर्षानुवर्षे भुवैकुंठात दाखल होतात. त्यात आळंदीहून निघणारी ज्ञानोबांची दिंडी सर्वात प्रभावी आहे. आळंदीहून येणारी ही दिंडी हैबतबाबांची असून वारीची सात्त्विक परंपरा दृढमूल करण्याचे श्रेय आधुनिक काळात हैबतबाबांनाच आहे. त्र्यंबकेश्वर (निवृत्तिनाथ), सासवड (सोपानकाका), एदलाबाद (मुक्ताई), पैठण (एकनाथ महाराज), देहू (तुकाराम महाराज) या मोठ्या दिंड्याही वारीसाठी पंढरीत येतात. त्याशिवाय अरणभेंडीहून सांवता महाराज, मंगळवेढ्याहून चोखोबा महाराज, तेरढोकीहून गोरोबाकाका, लऊळहून कुर्मदास महाराज यांच्या दिंड्याही पंढरीत उत्सवासाठी अक्षय परंपरेने येतात. नेवाशाहूनही दिंडी पंढरीत येते. वारकरी संप्रदायाची सात्त्विक परंपरा प्रामुख्याने महाराष्ट्रातील नामवंत फडांनी टिकविली आहे. वारकऱ्याचा आचार पाळणारे आणि पंढरीशाला भजणारे वारकरी महाराष्ट्रात लक्षावधी आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ते पसरले आहेत. अनेक गावात, शहरात हजारो वर्षे हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन करीत आहेत. लाखोंची वारी किंवा होणारे नामसंकीर्तन हे न चुकता सर्व शिस्तीने घडते आहे. याचे सर्व श्रेय संतांच्या ग्रंथसंपदेला आणि निरूपणाच्या माध्यमातून मशागत करण्याऱ्या लाखोंच्या भक्तांना जाते. त्यातही या संप्रदायात खोलवर रुजलेली फड परंपरेनी महत्वाची कामगिरी केली आहे. त्या त्या स्थळी असलेल्या वारकरी प्रमुख आणि त्यांच्या शिष्य मंडळींचा एकत्रित, संघटित, शिस्तबद्ध आणि सदाचारी समुदाय म्हणजे फड म्हणता येईल. पंढरीच्या वारीची शिस्त आणि कीर्तनभक्ती व नामस्मरण यांची अक्षुण्ण परंपरा या फडांमुळे अधिकच समृद्ध झाली आहे. स्वकर्म आचरल्यानंतर दिवसातील काही वेळ मुद्रा, भजन, कीर्तन, पाठांतर, मंत्रजप यासाठी प्रत्येक वारकऱ्याने द्यावयाचा असतो. वारकरी संप्रदाय हा खऱ्या अर्थाने सात्त्विक पंथ आहे. या संप्रदायाचे अनुयायी प्रामुख्याने बहुजन समाजातील असून गरीब कुटुंबातील असतात. परंतु त्यांची नीतिमत्ता, आदर्श, सदाचारी वर्तणूक बहुसंख्य वारकऱ्यांच्या कर्तव्यातून आणि कर्मातून सहजपणे प्रगट होत असते. पंढरी आणि देहू आळंदीच्या वाटेवर असताना वारकऱ्यांची ही सदाचारता निःसंशय प्रत्ययाला येते.

**रवींद्र मालुसरे**

# रात्री झोपण्यापूर्वी चुकूनही खाऊ नका 'हे' पदार्थ, अन्यथा आरोग्यावर होईल गंभीर परिणाम

दिवसभराच्या धावपळीनंतर रात्रीचे जेवण आराम आणि पोषण देते. पण यावेळी चुकीचे पदार्थ खाल्ल्याने केवळ पचनसंस्थेवर नाही तर झोप, वजन आणि एकूण आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतात. त्यामुळे नेहमी सांगितलं जातं की, रात्रीचे जेवण हलके, संतुलित सहज पचणारे असावे, जेणेकरून अन्न पचण्यासाठी जास्त मेहनत करावी लागत नाही आणि शांत झोप लागते.

**निरोगी आणि ताजेतवाने राहण्यासाठी रात्री कोणते पदार्थ खाणे टाळावे आणि कोणते पदार्थ अधिक चांगले पर्याय ठरू शकतात जाणून घेऊ...**



**रात्री कोणते पदार्थ खाणे टाळले पाहिजे?**

**१. तळलेले पदार्थ**

समोसे, पकोडे, फ्रेंच फ्राईज आणि इतर तळलेल्या पदार्थांमध्ये चरबीचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे ते पचायला जास्त वेळ लागतो. यामुळे गॅस, अपचन आणि ॲसिडिटी होऊ शकते. त्यामुळे रात्री हलक्या भाज्या, डाळी आणि मल्टीग्रेन रोटी खा.

**२. मसालेदार पदार्थ**

अति मसालेदार पदार्थांमुळे छातीत जळजळ आणि ॲसिडिटी वाढू शकते. तसेच त्याचा रात्रीच्या झोपेवरही परिणाम होऊ शकतो. याऐवजी कमी मसालेदार घरगुती जेवण हा एक चांगला पर्याय आहे .

**३. गोड पदार्थ आणि साखरयुक्त पदार्थ**

रात्री जास्त गोड खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढू शकते आणि अतिरिक्त कॅलरीजमुळे वजन वाढू शकते. जर तुम्हाला गोड खाण्याची इच्छा झाली, तर मर्यादित प्रमाणात फळे खा.

**४. कॅफीनयुक्त पेये**

रात्री चहा, कॉफी किंवा एनर्जी ड्रिंक्स प्यायल्याने झोप लागण्यास त्रास होऊ शकतो. कॅफीन शरीरात अनेक तास सक्रिय राहू शकते. कोमट दूध किंवा हर्बल टी (जर तुम्हाला आवडत असेल तर) हा एक चांगला पर्याय आहे.

**५. शीतपेये आणि कोल्ड ड्रिंक्स**

यामध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते आणि त्यामुळे गॅस वाढू शकतो. याचा परिणाम पचनक्रिया आणि झोप या दोन्हींवर होऊ शकतो. साधे पाणी किंवा लिंबू पाणी (साखर न घालता) प्या

**६. प्रक्रिया केलेले आणि पॅक केलेले पदार्थ**

चिप्स, इन्स्टंट नूडल्स, प्रक्रिया केलेले स्नॅक्स आणि खाण्यासाठी तयार पदार्थांमध्ये मीठ, प्रिझर्व्हेटिव्ह्ज आणि आरोग्यासाठी हानिकारक फॅट्सचे प्रमाण जास्त असू शकते. यामुळे घरी बनवलेले ताजे जेवण हे उत्तम पर्याय आहेत .

**रात्रीच्या जेवणाच्या चांगल्या सवयी**

१) रात्रीचे जेवण वेळेवर करा.

२) झोपण्याच्या दोन-तीन तास आधी रात्रीचे जेवण करा.

३) अन्न नीट चावूनच खा.

४) जेवणानंतर लगेच झोपणे टाळा.

५) पुरेसे पाणी प्या, पण झोपण्यापूर्वी लगेच जास्त पिऊ नका.

# सोनम वांगचुक यांनी २६ दिवसांनंतर सोडलं उपोषण; पण इतके दिवस उपाशी राहिल्यानंतर लगेच जेवल्यास काय होऊ शकतं?डॉक्टरांनी सांगितलं...

कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी तब्बल २६ दिवसांच्या बेमुदत उपोषणानंतर अखेर उपोषण सोडण्याचा निर्णय घेतला. सरकारकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर त्यांनी उपोषण समाप्त केल्याची माहिती समोर आली. मात्र, या घटनेनंतर अनेकांच्या मनात एकच प्रश्न निर्माण झाला आहे, इतके दिवस अन्न न घेतल्यानंतर शरीर लगेच पूर्ववत होतं का? उपवास संपल्यानंतर लगेच नेहमीप्रमाणे जेवण सुरू केल्यास काय होऊ शकतं?

आरोग्यतज्ज्ञांच्या मते, याचे उत्तर तितके सोपे नाही. दीर्घकाळ अन्नापासून दूर राहिल्यानंतर शरीरात अनेक जैविक बदल झालेले असतात, त्यामुळे अशा वेळी अन्न पुन्हा सुरू करताना अत्यंत काळजी घेणे आवश्यक असते, अन्यथा गंभीर आरोग्यधोके निर्माण होऊ शकतात.



**शरीरात नेमकं काय घडतं?**

राजीव गांधी रुग्णालयातील असोसिएट प्राध्यापक डॉ. अजित कुमार सांगतात की, जेव्हा शरीराला अनेक दिवस पुरेसं अन्न मिळत नाही, तेव्हा सुरुवातीला शरीरातील चरबी ऊर्जेसाठी वापरली जाते. त्यानंतर स्नायूंमधील साठाही खर्च होऊ लागतो. या काळात इन्सुलिनची पातळी कमी होते आणि शरीराची ऊर्जा लक्षणीयरीत्या घटते, त्यामुळे दीर्घ उपवासानंतर शरीर लगेच नेहमीचं अन्न पचवण्याच्या स्थितीत नसतं, त्यामुळे उपोषण संपल्यानंतर लगेच भरपूर किंवा नेहमीप्रमाणे जेवण करणं योग्य नसतं. शरीराला पुन्हा अन्नाशी जुळवून घेण्यासाठी वेळ द्यावा लागतो.

**अचानक जेवण सुरू केल्यास कोणता धोका असतो?**

डॉ. अजित कुमार यांच्या मते, दीर्घकाळ उपाशी राहिल्यानंतर अचानक अन्न सुरू केल्यास 'रिफीडिंग सिंड्रोम' नावाची गंभीर वैद्यकीय समस्या उद्भवू शकते. या अवस्थेत शरीरात इन्सुलिनची पातळी झपाट्याने वाढू शकते आणि इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन बिघडू शकते, त्यामुळे हृदय, स्नायू आणि मज्जासंस्थेवर परिणाम होण्याचा धोका वाढतो.

याच कारणामुळे डॉक्टर रुग्णाला उपोषणानंतर थेट नेहमीचं जेवण देत नाहीत. सुरुवातीला कमी प्रमाणात आणि सहज पचणारे द्रव पदार्थ दिले जातात, त्यानंतर हळूहळू मऊ आणि हलका आहार सुरू केला जातो.

**डॉक्टर कशाप्रकारे आहार सुरू करतात?**

दीर्घ उपवासानंतर रुग्णांसाठी स्वतंत्र आहार योजना तयार केली जाते. डॉक्टर आणि आहारतज्ज्ञांच्या देखरेखीखालीच अन्न दिलं जातं. या काळात रक्तदाब, नाडी, रक्तातील साखरेची पातळी, ऑक्सिजन आणि इलेक्ट्रोलाइट्स यांच्यावर सातत्याने लक्ष ठेवलं जातं.

सुरुवातीला नारळपाणी, सूप, ओआरएससारखे द्रव पदार्थ दिले जातात; त्यानंतर पचायला सोपा आणि मऊ आहार हळूहळू सुरू केला जातो. शरीराची प्रतिक्रिया पाहूनच पुढील आहार ठरवला जातो.

**व्हिटॅमिन बी-१ का महत्त्वाचं ठरतं?**

डॉ. अजित कुमार सांगतात की, अनेक दिवस उपाशी राहिल्यानंतर शरीरात थायमिन (व्हिटॅमिन बी-१) ची कमतरता निर्माण होऊ शकते. ही कमतरता भरून न काढता अन्न सुरू केल्यास मेंदू आणि मज्जासंस्थेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते, त्यामुळे काही रुग्णांना डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार थायमिनचे पूरक औषध दिले जाते. मात्र, प्रत्येक रुग्णाची गरज वेगळी असल्याने हा निर्णय वैद्यकीय तपासणीनंतरच घेतला जातो.

**शरीर पूर्णपणे पूर्ववत होण्यासाठी किती वेळ लागू शकतो?**

दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयाचे माजी निवासी डॉक्टर दीपक कुमार यांच्या मते, २६ दिवस उपोषण केल्यानंतर शरीर पूर्ववत होण्यासाठी काही आठवडे लागू शकतात. हा कालावधी व्यक्तीचं वजन किती कमी झालं, शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्सचं संतुलन कसं आहे, तसेच आधीपासून इतर आजार आहेत का, यावर अवलंबून असतो.

जर आरोग्याची स्थिती चांगली असेल आणि सर्व तपासण्या सामान्य असतील, तर काही दिवसांतच व्यक्ती पूर्वीप्रमाणे सक्रिय होऊ शकते. मात्र, घाई न करता डॉक्टरांच्या सल्ल्यानेच आहार वाढवणं महत्त्वाचं ठरतं.

ब्रिटनमधील नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ अँड केअर एक्सलन्स (NICE) आणि ब्रिटीश मेडिकल जर्नल (BMJ) यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, दीर्घ उपवासानंतर किमान चार ते सात दिवस रुग्णाच्या इलेक्ट्रोलाइट्स आणि इतर आरोग्य घटकांवर नियमित लक्ष ठेवणं आवश्यक असतं, त्यानंतरच टप्प्याटप्प्याने नेहमीचा आहार सुरू केला जातो.

सोनम वांगचुक यांच्या उपोषणामुळे पुन्हा एकदा दीर्घ उपवासानंतर शरीराची योग्य काळजी घेण्याचं महत्त्व अधोरेखित झालं आहे. अशा परिस्थितीत कोणताही निर्णय स्वतः न घेता वैद्यकीय तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच आहार सुरू करणं अधिक सुरक्षित मानलं जातं.